# संपादकीय

## मुद्रित प्रसारमाध्यमांपुढचे परदेशी भांडवलाचे आव्हान

सर्व क्षेत्रात स्वदेशीचा नारा देणाऱ्या भारतीय जनता पार्टीच्या राजवटीत आर्थिक उदारीकरणाच्या नावाने परकीय भांडवलाला मुक्तद्वार दिले जावे हा एक दैवदुर्विलासच म्हणावा लागेल. भारतातील मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये म्हणजे दैनिक व साप्ताहिकांमध्ये परदेशी कंपन्यांना आजवर भांडवल गुंतवण्यास परवानगी नव्हती आणि गतवर्षी यासंबधात नेमलेल्या सोमनाथ चॅटर्जी समितीने केलेली मुद्रित प्रसार माध्यमात परदेशी गुंतवणुकीस परवानगी नसावी ही शिफारस वाजपेयींनी स्वीकारण्याचे आश्वासन दिलेले असताना पूर्ण घूमजाव करणारा निर्णय २५ जूनला मंत्रीमडळाच्या बैठकीत घ्यावा याचे आश्चर्य वाटणे साहजिकच आहे. पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी सरळ सरळ लोकसभेच्या समितीची शिफारस डावलून हा जो निर्णय घेतला आहे, त्याचे भारतातील वृत्तपत्र व्यवसायावर आणि विचार-अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गंभीर परिणाम होणे अपरिहार्य आहे. एवढेच नव्हे, तर देशाच्या सार्वभौमत्वालाही त्यामुळे धोका संभवतो.

जागतिक व्यापार संघटनेने उद्योगव्यवसायातील गुंतवणुकीत परदेशी भांडवलाला मुभा देण्याचा आग्रह आरंभापासून धरलेला आहे. त्या आग्रहापुढे मान तुकवणे क्रमप्राप्त ठरते. परंतु वृत्तपत्र व्यवसाय हा त्याला अपवाद होता. त्यामुळे वाजपेयी सरकारने वृत्तपत्रांमध्ये परकीय भांडवल गुंतवणुकीचा निर्णय घेण्याची तशी काहीच तातडीची कारणे नव्हती. लोकसभेच्या सोमनाथ चॅटर्जी समितीने केलेली शिफारस गतवर्षी प्रथम मान्य केलेली असल्याने, सरकारने आकस्मिकपणे घूमजाव करून सर्वांनाच चकित केले.

मंत्रीमंडळीच्या या निर्णयान्वये दैनिके-साप्ताहिके वगैरे बातम्यांवर भर देणाऱ्या प्रकाशनांमध्ये परदेशी गुंतवणूक २६ टक्क्यापर्यंत करण्याची मुभा राहील, तर बातम्यांवर भर नसणाऱ्या नियकालिकांबाबत ७४ टक्के परकीय भांडवलाला मोकळीक राहील. याचा अर्थ दैनिके-साप्ताहिके काढणाऱ्या संस्थांमध्ये परकीय भांडवल एक चतुर्थांश राहू शकेल; म्हणजेच संचालक मंडळातील एक चतुर्थांश सदस्य त्या परदेशी कंपन्यांचे राहतील, त्यांच्या प्रगत तंत्रज्ञानामुळे आणि व्यापक नेटवर्कमुळे त्यांचा प्रभाव हा त्यांच्या सदस्यसंख्येच्या प्रमाणापेक्षा आधिक राहण्याची शक्यता अर्थातच येथे गृहीत धरावी लागते. "अमेरिकेत दहा हजार कोटींची गुंतवणूक असलेला वृत्तपत्रसमूह एखाद्या भारतीय दैनिकात फक्त शंभर कोटी रुपये गुंतवणूक करून भारतविरोधी भूमिका घेऊ शकतो" असे सकाळ वृत्तपत्र समूहाचे व्यवस्थापकीय संपादक प्रतापराव पवार यांनी म्हटले आहे. ते या धोक्याचे निदर्शक आहे. भारताचे हित हा अशा व्यवहारात गौण भाग ठरतो; येथील समाजाची, संस्कृतीशी, नीतिमूल्यांशी त्यांना काही घेणेदेणे नसते. ते त्यांच्याच मतांचा, मूल्यांचा कळतनकळत प्रसार करीत असतात. त्यामुळे आपल्याकडच्या वृत्तपत्रातून उद्या न्यूयॉर्क टाइम्स, वॉशिंग्टन पोस्ट, लंडनचे टाइम्स, किंवा टाइम, न्यूजवीक यांचेच विचार अग्रक्रमाने येऊ लागतील. अमेरिकेत, ब्रिटीश वा तत्सम राष्ट्रांची धोरणे ही या ना त्या स्वरूपात अग्रभागी जागा पटकावत राहतील आणि येथील वाचकांचा बुद्धिभेद करीत राहतील. परदेशी भागभांडवलामुळे मोठी साखळी वृत्तपत्रे ही अधिक स्पर्धात्मक वातावरणात फेकली जातील; आणि त्यांचे आजचे स्वातंत्र्य धोक्यात येईल.

दूरचित्रवाणीवर वेगवेगळ्या परदेशी कंपन्यांना मुक्त प्रवेश मिळाल्यावर स्टार, सोनी, झी टिव्ही, वगैरेंनी ज्या प्रकारचे कार्यक्रम भारतीय प्रेक्षकांना दाखवण्याचा सपाटा लावला आहे, त्यापैकी बरेच कार्यक्रम आपल्या सामाजिक सदभिरूचीच्या कल्पनांना व पारंपरिक नीतिमूल्यांना हादरा देणारे आहेत. म्युझिक टीव्हीवर अर्धनग्न तरुणतरुणींची उत्तान नृत्ये चोवीस तास चालू असतात. बेवॉच, बोल्ड अँड ब्युटिफूल वगैरे मालिकांमध्ये पाश्चात्य तरुणींचे बेबाक देहप्रदर्शन चालू असते. चुंबन-आलिंगनांच्या सीमा 'मिक्सिंग'च्या तांत्रिक प्रगतीमुळे कुठवर ताणल्या जाऊ शकतात, हे तर विचारूच नका. जाहिरात व्यवसाय करणाऱ्या संस्था, मार्केटिंग रिसर्च संस्था यांचा शंभर टक्क परकीय गुंतवणुकीची मुभा आहे, त्यामुळे प्रसारमाध्यमांच्या लोकप्रियतेची जी आकडेवारी वेळोवेळी हीर करण्यात येते, तिच्यामुळेही कार्यक्रमांच्या निवडीवर मोठा परिणाम होतो. चंगळवादी, संस्कृती येथील जनतेत रुजविण्यासाठी अत्यंत चलाखीने कार्यक्रमांची आखणी केली जाते. परदेशी ब्युटी कॉंटेस्ट, सौंदर्य प्रसाधने, चैनीची साधने, भारी ब्रँडेड उत्पादने या सर्वांच्या प्रशस्तीचा व महतीचा सतत उद्घोष करून लहान मुलांपासून वयोवृद्धापर्यंत सर्वांचेच मेंदू व विचार कुंठित केले जात आहेत; आणि त्यापुढे आपल्या भारतीय उत्पादनांचे मोल व महत्व मागे पडत आहे. इन्शुरन्स क्षेत्र, बँकिंग क्षेत्र यातही परदेशी तंत्रज्ञानामुळे नवे स्पर्धात्मक वातावरण निर्माण झाले आहे. तेव्हा एकूणच आता भारतात परदेशीयांना मुक्त स्वैर संचार सर्वच क्षेत्रात करण्याची मोकळीक मिळाली आहे. वृत्तपत्रे, साप्ताहिके, नियतकालिके ही व्यक्तीचे व समाजाचे विचार घडविण्यात व मते बनविण्यात विशिष्ट भूमिका बजावतात. विशिष्ट मतांच्या प्रसारासाठी वृत्तपत्रे काढली व चालवली जातात. स्वातंत्र्यपूर्ण काळात 'केसरी' सारखी वृत्तपत्रे ही स्वांतत्र्याचे आंदोलन तीव्र करण्यासाठीच चालवली गेली होती. हिंदू, इंडियन एक्सप्रेस, हिंदुस्थान टाइम्स वगैरे नावांवरूनही येथील भूमीवरच्या निष्ठा प्रकट होत होत्या. आता पाश्चात्य वृत्तपत्रांचा प्रभाव आपल्यावर अधिकृतरीत्या पडत राहणार-कारण त्यांच्या आर्थिक सहभागामुळे, प्रगत तंत्रज्ञानामुळे आणि त्यांच्या व्यापक क्षमतेमुळे आपल्या मर्यादित साधनसामग्री व भांडवलावर कशीबशी गुजराण करणाऱ्या वृत्तपत्रांची अवस्था आणखीनच बिकट होत जाणार. जाहिरातींचा ओघ हा अधिक खपाच्या व उत्तम मुद्रण सुविधा असलेल्या बड्या वृत्तपत्रांकडे वळत जाणार आणि कमी खपाची वृत्तपत्रे ही मागे पडत राहणार. आर्थिक दृष्ट्या मागे पडण्याऐवजी परदेशी सहकार्याने निदान उभे तरी राहता येईल असा विचार करून, ती आपले अस्तित्व की आपले स्वातंत्र्य या पेचात पडणार. बरीचशी वृत्तपत्रे ही अपुऱ्या भांडवलावर, जुनाट यंत्रसामग्रीवर आणि अत्यल्प मनुष्यबळावर चाललेली आहेत. अधिक प्रशिक्षित पत्रकार कर्मचारी आणि अद्ययावत यंत्रसामग्री यांची जोड द्यायची म्हटली तर त्यांचा आर्थिक डोलारा कोसळून पडेल. अशी वृत्तपत्रे त्याच गावात जर परदेशी भांडवलीने परिपुष्ट झालेले प्रतिस्पर्धी दैनिक आले तर बंदच पडतील. शिक्षण व जनमत तयार करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून ही स्थानिक छोटी वृत्तपत्रे भूमिका बजावतात. त्यांच्या या कामाला खीळ बसेल. परदेशी भागभांडवलाचा मुद्रित प्रसार माध्यमातील प्रवेश हा भारतीय स्वातंत्र्यावरचा आणि सार्वभौमत्वावरचा छुपा हल्लाच ठरेल. 'भारतीय जनता पार्टी' या भारतीय संस्कृतीचा व हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या पक्षाच्या अधिपत्याखालील सरकारच्या कारकीर्दीत असा काही निर्णय व्हावा याची त्यामुळेच अधिक चिंता वाटते.

वृत्तपत्रातील परकीय भांडवलाचे संभाव्य परिणाम हे मराठी व प्रादेशिक भाषांतील ग्रंथव्यवहारालाही धक्का देणारे ठरतील. परदेशी पुस्तकांची आजवर विपुल आयात आपल्या देशात होत राहिली आहे. परदेशी प्रकाशकांनी येथे आपली कार्यालये काढून भारतीय शाखांचेही जाळे उभे केले आहे. परंतु आजवर त्यांचे कार्यक्षेत्र मुख्यत: इंग्रजी भाषेपुरते व शैक्षणिक पुस्तकांपुरते सीमित होते. यापुढच्या काळात ते प्रादेशिक भाषांतील पुस्तकांच्या क्षेत्रातही विस्तार पावत राहील, आणि येथील

छोट्यामोठ्या प्रकाशकांनाही त्यामुळे नव्या स्पर्धेला तोंड द्यावे लागेल. तिकडचे उत्तम सजावट असलेले बालवाङ्मय, विज्ञानविषयक वाङ्मय, कोशवाङ्मय, व्यक्तिमत्त्व विकासाचे कानमंत्र देणारे वाङ्मय वगैरे आपल्या भाषांमध्ये सहजपणे अनुवादित स्वरूपात येऊ लागेल. येथील लेखककवींना मग कोण विचारणार? एकूणच आपल्या वृत्तपत्रक्षेत्राला व ग्रंथप्रकाशनक्षेत्राला परकीय भांडवलाच्या मुक्त प्रवेशाला आपल्या अस्तित्वाची नव्याने व्यूहरचना करावी लागणार आहे.

**जाता जाता**

**पहिल्या आवृत्तीच्या प्रतींचे विक्रमी लिलाव**

सोदबी या कंपनीच्या मार्फत कलावस्तूंचे जागतिक लिलाव होत असतात. नुकत्याच म्हणजे १२ जुलैला इंग्लंडमध्ये झालेल्या एका लिलावात काही पुस्तकांच्या पहिल्या आवृत्तींच्या प्रतींना विक्रमी किंमत मिळाली. हॅरी पॉटर अँड दि फिलासॉफर्स स्टोन या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीची प्रत १६ हजार डॉलर्सना विकली गेली. तिच्यावर लेखिका जे. के. रोलिंग हिची स्वाक्षरी होती. जे. आर. आर. टोलकिन या लेखकाच्या 'हॉबिट'ची १९३७ साली पहिली आवृत्ती प्रसिद्ध झाली. तिची एक प्रत लेखकाने आपल्या आत्येला भेट दिली होती. त्या प्रतीला लिलावात ६६६३० डॉलर्स मिळाले. एखाद्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीला एवढी जास्त किंमत यापूर्वी कधी मिळाली नव्हती असे या लिलाव करणाऱ्या संस्थेने म्हटले आहे. बीट्रिक्स पॉटर लिखित पीटर रॅबिटची पहिली आवृत्ती फक्त २५० प्रतींची होती. त्यापैकी एका प्रतीला या लिलावात ६४७८० डॉलर्स मिळाले. २५० दुर्मिळ पुस्तके असलेल्या एका खाजगी ग्रंथसंग्रहाला लिलावात ५ लाख १२ हजार डॉलर्सची बोली आली. या संग्रहात चार्लस डिकन्सची अनेक पुस्तके होती.

**आणि परदेशी चित्रपटांचे भारतातील उत्पन्न**

'स्पायडरमॅन' या चित्रकथानायकावर निघालेला चित्रपट भारतात २५० ठिकाणी एकाच वेळी प्रदर्शित झाला. त्याने परदेशी चित्रपटाच्या पहिल्या आठवड्यातील आजवरच्या उत्पन्नाचे उच्चांक मोडले. ५ कोटी ३० लाख रुपयांचे उत्पन्न पहिल्या आठवड्यात आणि ३.४ कोटीचे उत्पन्न दुसऱ्या आठवड्यात मिळवणारा हा एकमेव चित्रपट आहे. स्पायडरमॅनबरोबरच लागलेल्या हम किसीसे कम नही या चित्रपटाला पहिल्या आठवड्यात ४ कोटींचे उत्पन्न झाले हे लक्षात घेतले तर स्पायडरमॅनचे यश अधिकच नेत्रदीपक ठरते.

हॅरी पॉटरने पहिल्या आठवड्यात १ कोटी ३० लाखांची कमाई केली तर दि लॉर्ड ऑफ दि रिंग्ज या टोलकिनच्या कथेवरील चित्रपटाने ८४ लाख रुपये मिळवले.

स्टार वॉर्स मालिकेतील अॅटॅक ऑफ दि क्लोन्सने ९४ लाख रुपये पहिल्या सप्ताहात मिळवले. याच काळात शहीद भगतसिंह (२.९ कोटी), मेरे यार की शादी (२ कोटी), दि लिजंड ऑफ भगतसिंग (२.१ कोटी) यांनी चांगली कमाई केली. बधाई हो बधाईने पहिल्या आठवड्यात २ कोटी रुपये मिळवले; तर 'कंपनी' ने ३.२ कोटी. हॉलीवुडमधील काही चित्रपट हिंदी वगैरे भाषात डब करून दाखवले जातात, त्यापेक्षा मूळ इंग्रजी चित्रपटांना प्रेक्षकांचा प्रतिसाद भारतात जास्त लाभतो असेही चित्रपट क्षेत्रातील जाणकारांचा अनुभव आहे. ट्रेड गाइड या चित्रपटविषयक साप्ताहिकात याबद्दलची ताजी आकडेवारी देण्यात येते.

**संपादक**



**साहित्यवार्ता**

**शिक्षणासाठी ऐपत असलेल्या वर्गाने खर्च करणे अपेक्षित : प्रा. रामकृष्ण मोरे**

शिक्षणशेत्राला शक्य तेवढ्या सवलती शासन देत आहे; मात्र शिक्षण घेण्यासाठी पैसे खर्च करण्याची ज्यांची ऐपत आहे अशा वर्गाने शिक्षणासाठी खर्च करणे अपेक्षित आहे, असे मत शालेय शिक्षणमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे यांनी व्यक्त केले.

राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाच्या वतीने (बालभारती) तयार करण्यात आलेल्या चार पाठ्येतर पुस्तकांचे प्रकाशन झाले. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. वसंत गोवारीकर, डॉ. अरुण टिकेकर, मंडळाचे संचालक एन. के. राठोड या वेळी उपस्थित होते.

प्रा. मोरे म्हणाले, की प्राथमिक शिक्षणाचा प्रसार होण्याची आवश्यकता सर्वत्र बोलून दाखविली जाते; मात्र याची सर्वाधिक अंमलबजावणी महाराष्ट्रात झाली आहे. स्वतंत्रपणे प्राथमिक शिक्षण संचालनालय सुरु करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. राज्यात सध्या ६७ हजार माध्यमिक व साडेतीन हजार उच्च माध्यमिक शासकीय अनुदानित शाळा आहेत. यातही महाराष्ट्राचा देशात प्रथम क्रमांक आहे.

एकूण वस्तीशाळांची संख्या ४ हजार ७०० आहे. वंचितांना प्राथमिक शिक्षण मिळावे या हेतूने महात्मा फुले शिक्षण हमी योजना स्वयंसेवी संस्थांमार्फत राबविण्यात येत आहे. मात्र स्वयंसेवी संस्थाकडून या योजनेला फारसा प्रतिसाद मिळत नाही, अशी खंत प्रा. मोरे यांनी व्यक्त केली.

तंत्रज्ञानात रोज होणारी प्रगती पाहता यापुढे वैज्ञानिक व समाज यांचे अतूट नाते निर्माण होण्याची गरज आहे, असे मत डॉ. गोवारीकर यांनी व्यक्त केले. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि नव्या बदलांचे प्रतिबिंब समाजात दिसणे आवश्यक आहे. बालभारतीने तयार केलेल्या शालेय मराठी शब्दार्थसंग्रह, उत्तम संस्कारकथा, शालेय नागरिकशास्त्र आणि शासन कोश व माहिती आहे का तुला या पाठ्येतर पुस्तकांचे प्रकाशन झाले.

**अखंड हिंदुस्थान मंचातर्फे साहित्य संमेलन**

अखंड हिंदुस्थान मंचच्या वतीने ज्येष्ठ साहित्यिक शांता शेळके यांच्या स्मरणार्थ द्वितीय राज्यस्तरीय साहित्य-संमेलन आयोजित करण्यात येणार आहे, त्याच्या प्राथमिक तयारीसाठी १४ जुलै रोजी स्वा. सावरकर स्मारक येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, अशी माहिती कार्याध्यक्ष विलास जैन व सरचिटणीस राम तोरकडी यांनी दिली. या संमेलनात स्वच्छता मोहीम, कौन बनेगा सभापती, विविध गुणदर्शन, चर्चासत्रे अशा कार्यक्रमांचा समावेश आहे, शांता शेळके यांच्या साहित्यावर आधारित लेखांचे प्रदर्शन भरवण्यात येणार आहे.

## नवीन ज्ञानाच्या वहनासाठी कोशवाङ्मय उपयुक्त

''कोशवाङ्मय दुर्लक्षित राहत असले, तरी भाषासंवर्धनास व नवीन ज्ञानाच्या वहनास ते उपयुक्त असते,'' असे ज्येष्ठ साहित्यिक द. मा. मिरासदार यांनी सांगितले.

सुपर्ण प्रकाशनातर्फे डॉ. सदाशिव देव यांचे 'कोशवाङ्मय : विचार व व्यवहार' हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. समीक्षक डॉ. द. दि. पुंडे हे प्रमुख वक्ते होते.

कोश हे त्या त्या भाषकाच्या अस्मितेशी निगडित असतात,' असे सांगून डॉ. देव म्हणाले, मुंबईत कृ. पां. कुलकर्णी हे माझे सहप्राध्यापक होते. त्यांचा व्युत्पत्ती कोश तयार होत असताना त्यांच्याशी ज्या चर्चा होत त्यातून माझ्यासारख्या गणिताचा प्राध्यापक कोशवाङ्मयाकडे वळला. परिपूर्ण व वाचनीय कोश तयार व्हावेत, अशी माझी इच्छा आहे. मराठीतील कोश सकस व विकसित आहेत. मात्र आपल्या शालेय अभ्यासक्रमाशी कोश वाङ्मयाची सांगड घालण्यात आलेली नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग कसा करावा, हेच कळत नाही.''

मराठीत कोशरचनेचे शास्त्र सुस्थिर झाल्याचे डॉ. पुंडे यांनी सांगितले. मराठीला कोशरचनेची दोनशे वर्षांची परंपरा आहे. या काळात सुमारे ६९३ कोश तयार झाले आहेत. महाराष्ट्राला कोशरचनेचे वेड आहे. प्रत्येक दशकात कुणीतरी अभ्यासक एखादा ज्ञानविषय घेऊन आपले अवघे आयुष्य व आयुष्यभराचे धन वेचून कोश निर्माण करतो,'' असे त्यांनी सांगितले.

## कविवर्य महानोर यांचा सत्कार

कवितेने आपल्याला रसिकत्व मिळवून दिले. या रसिकांच्या धाकावर आणि प्रेमावरच आपण लिहीत आणि जगत आलो, अशा शब्दांत ज्येष्ठ कवी ना. धों. महानोर यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेची पिंपरी-चिंचवड शाखा, कलारंग प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र कामगार साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना उल्हास पवार यांच्या हस्ते पाच हजार रुपये आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. कवी फ. मुं. शिंदे, डॉ. रामचंद्र देखणे, प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी निर्मलकुमार देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नाट्य परिषदेचे शाखाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, साहित्य परिषदेचे अध्यक्ष पुरुषोत्तम सदाफुले या वेळी उपस्थित होते.

महानोर म्हणाले, ''यशवंतराव चव्हाणांच्या विचारांपासून अशी व्यासपीठे पाहिल्यानंतर यशवंतरावांच्या विचाराबरोबरच महाराष्ट्र चालला असल्याचे जाणवते. कवी नारायण सुर्वे आणि माझ्यासारख्या फाटक्या ठिकाणांहून आलेल्या कवींचा सन्मान होतो आहे. म्हणूनच त्याबद्दल वेगळा आदरभाव निर्माण होतो.''

बीज शुद्ध असले, की त्याला कोणी थांबवू शकत नाही. तसेच चांगले साहित्य आणि कलावंत यांना कोणीही थोपवू शकत नाही. आपल्या कवितेचे बीज शुद्ध होते. लोकसाहित्य, लोकसंस्कृती, लोकपरंपरा यातूनच आपण पुढे गेलो. तेव्हा शब्दकळा कशी आली ते समजले नाही. शेतीवाडीत जे जगलो, भोगले ते कुवतीने मांडण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वर-तुकारामांच्या पायवाटेने चालता आले आणि लोकांच्या दुःखावर फुंकर मारता आली, यात धन्यता आहे. अनुभवाचे जे काही



असेल ते लिहीतच जाणार आहे.''

''राजकारणात आपण आलो; पण त्यातील वाइटाला कधीही स्पर्श केला नाही. शेतीविषयक जे प्रश्न मांडले, तेही कवितेमुळे,'' असे महानोर यांनी सांगितले.

उल्हास पवार म्हणाले, ''लोकसाहित्य व लोकसंस्कृतीशी कधीही नाळ न तोडणारा हा महान कवी आहे. त्यांचे निसर्गावर अफाट प्रेम आहे. सभागृहात शेतकऱ्यांचे प्रश्न त्यानी पोटतिडकीने मांडले.''

महानोर म्हणजे निसर्ग कवितामंदिराचा कळस असे फ. मुं. शिंदे म्हणाले.

डॉ. अरुणा ढेरे, नारायण सुमंत, रेणू पाचपोर, तसेच स्थानिक कवी अशोक कोठारी, अमृत पऱ्हाड, रोहित ठुबे, कुमार खोंद्रे, गोकुळ पवार, प्रकाश परदेशी, सचित्रा फुलमांबडीकर यांनी काव्यवाचन केले.

## बंधुता संमेलनाची अध्यक्षीय भाषणे

''समाजातील बंधुतेचा धागा क्षीण झाल्याने देवा-धर्माच्या नावाखाली हिंसा वाढली आहे. अशा वेळी माणसाला त्याची मूल्ये परत मिळवून देण्याचा प्रयत्न चळवळींनी करावा,'' असे आवाहन उत्तम कांबळे यांनी केले.

बंधुता प्रकाशन व राष्ट्रीय बंधुता समाज आयोजित 'बंधुतायण' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. अपर्णा साबणे यांच्या हस्ते झाले. प्राचार्य सीताराम गोसावी प्रमुख पाहुणे होते. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश रोकडे यांनी हे पुस्तक संपादित केले आहे.

बंधुतेच्या पेरणीच्या जागाही क्षीण होते चालल्या आहेत, याची जाणीव करून देत कांबळे म्हणाले, ''करुणेचा सागर असलेला माणूस हिंस्र हा होतो? माणसाला खऱ्या धर्मापासून, बंधुतेपासून दूर नेत त्याच्याकडून हिंसा घडवली जाते. माणूस नाकारणारी येथील व्यवस्था धर्माच्या नावाखाली माणसाचे अवमूल्यन करते. धर्म ही 'एजन्सी' आहे. ती माणसाला देवा-धर्माकडे नेत नाही; ती फक्त पुरोहितशाहीकडे नेते. अशा काळात बंधुतेच्याच धाग्याने माणसाला त्याचा चेहरा मिळवून देण्याचे काम करावे लागेल. या पुस्तकात बंधुता संमेलनाच्या तीन अध्यक्षांची भाषणे व वृत्तांत असल्यामुळे हे पुस्तक समीक्षेतील ऐतिहासिक दस्तऐवज ठरेल. अयोध्या प्रकरणात न्यायालयाचा निर्णय मानणार नाही, असे म्हणणाऱ्यांकडून येथील लोकशाही व न्याय व्यवस्था नाकारली जाते,'' याकडे त्यांनी लक्ष वेधले.

प्रा. साबणे म्हणाल्या, ''देशातील हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर हे चिंतन प्रसिद्ध होत आहे. स्वार्थ सोडून सर्वांनी एकत्र येण्याची व समाजकल्याणाच्या आड येणारे प्रश्न सोडविण्याची गरज आहे.'' उद्धव कानडे यांनी सूत्रसंचालन केले.

## डॉ. राम म्हैसाळकर यांच्या रवींद्र भावांजलीचे प्रकाशन

सूर्या फाउंडेशनच्या वतीने २६ जूनला डॉ. राम म्हैसाळकर लिखित 'रवींद्र भावांजली' आणि 'एक होता गंधर्व' या पुस्तकांचे प्रकाशन साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. रं. बोराडे यांच्या हस्ते करण्यात आले. नाट्य समीक्षक वि. भा. देशपांडे हे या प्रसंगी उपस्थित होते.

कविवर्य रवींद्रनाथ टागोर यांच्या 'शिशू' या बंगाली काव्यसंग्रहातील 'चंद्र चवथिचा' आणि आध्यात्मिक कवितांचा 'क्रॉसिंग' मधील 'रवींद्र भावांजली' या नव्या पुस्तकात समावेश करण्यात आला आहे.

कविवर्य वसंत बापट यांनी या पुस्तकाला प्रस्तावना दिली आहे, तर बालगंधर्व यांच्या ओघवत्या शैलीतील जीवन चरित्राचा समावेश 'एक होता गंधर्व' या पुस्तकात करण्यात आला आहे.

## ट्रकच्या अपघातानेच व्यंगचित्रकार बनवले

''मला झालेल्या ट्रकच्या अपघातानेच मी चित्रकार आणि व्यंगचित्रकार बनलो,'' असे प्रसिद्ध चित्रकार पुंडलिक वझे यांनी सांगितले. 'माझ्या कलाजीवनाचा प्रवास' असा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

वझे म्हणाले,''माझे गाव छोटे. चित्रकलेला शिक्षक नव्हता. कुंभाराच्या घरी गणपती पाहून चित्रे काढू लागलो. गणेशमूर्ती बनवू लागलो. माझ्या छंदाला घरातून विरोध होता; म्हणून बाराव्या वर्षी घरातून पळालो. रोज वीस-तीस मैल चालत कोल्हापूरच्या शालिनी सिनेटोनमध्ये आलो. प्रवासात कोकमची पाने आणि पाणी पिऊन भूक भागवली. सिनेटोनमध्ये मला प्रवेश मिळाला नाही. हिरमुसला होऊन परतलो. पुन्हा प्रवासाला निघालो. प्रवासात चालून चालून चक्कर आली. चिपळूणच्या मंदिरात झोपलो. लमाणांचा एक तांडा तेथे होता. त्यांनी मला सोबत नेले. लमाणांच्या मुलांना मी चित्रे काढायला शिकवीत असे; पण तेथे मन रमत नव्हते. कसाला (जि. सिंधुदुर्ग) येथे दुकानात नोकरी केली. शेतकऱ्याच्या घरी राहिलो. दहावी झालो. जे. जे. स्कूलमध्ये चित्रकलेचे शिक्षण घ्यायच्या हेतून मुंबईत आलो. प्रवेशासाठी पैसे नव्हते. एक दिवस दुर्दैवच माझे नशीब बनून आले. एका ट्रकने मला ठोकरले. अपघाताची नुकसान भरपाई म्हणून मला तीस हजार रुपये मिळाले. त्या पैशातून चित्रकला शिकलो. आता महाराष्ट्रात व्यंगचित्रकार म्हणून थोडेफार नाव झाले आहे.''

## श्रीज्ञानेश्वरी संबोधिनीचे भाषांतर

फलटण येथील गोविंद महाराज उपळेकर यांनी लिहिलेल्या 'श्रीज्ञानेश्वरी संबोधिनी अध्याय सहावा' या ग्रंथाचे रा. ना. चिन्मुळगुंद यांनी संस्कृतमध्ये भाषांतर केले असून, उपळेकर समाधी मंदिरात त्या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी चिन्मुळगुंद यांनी सांगितले की, भारतातील निरनिराळ्या भाषांमध्ये सुबोध ज्ञानेश्वरीचे भाषांतर करण्यात येत आहे. गोविंदकाका उपळेकर यांच्या कृपेनेच मी आज संस्कृतमध्ये ज्ञानेश्वरी संबोधिनीचे भाषांतर करू शकलो.

या पुस्तकाच्या प्रकाशनाचा खर्च भाविकांनी दिलेल्या देणगीमधून केल्याने पुस्तकाचे वितरण मोफत करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

श्रीज्ञानेश्वरी सुबोधिनी हा टीकात्मक ग्रंथ एक ते अठरा खंडांमध्ये प्रसिद्ध करण्याचा संकल्प गोविंदकाका उपळेकर साहित्य संस्थेने सोडला आहे.

## संगणकाच्या बहुभाषिक वापरासाठी लवकरच नवे तंत्रज्ञान

संगणकाचा बहुभाषिक वापर सुलभ होण्यासाठी सी-डॅक व युरोपीय समुदायातील देशांच्या साह्याने नवे तंत्रज्ञान विकसित करण्यात येत आहे. त्यासाठी पुण्यात दोन दिवसांची इंडो-युरोपियन



कॉन्फरन्स ऑन मल्टिलिंग्वल कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी आयोजित केली गेली.

केंद्र सरकारच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने या परिषदेसाठी साह्य केले. युरोपीय समुदायातील देशांनी फ्रेंच, स्पॅनिश व इतर भाषांमध्ये सुलभ वापरता येईल, असे तंत्रज्ञान विकसित केले आहे. भारतातील विविध भाषांचा असा वापर होण्यासाठी सी-डॅक व फ्रान्समधील 'प्लानिस्ट युरोप' या संस्थेदरम्यान करार झाला आहे. या संस्थेचे ॲगस्टिन बेनुआं, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव राजीवरत्न शहा, एचपी लॅब्सचे संचालक एस. रमणी, सी-डॅकचे कार्यकारी संचालक आर. के अरोरा उद्घाटनाप्रसंगी उपस्थित होते.

श्री. रमणी म्हणाले, ''भारतातील संगणक वापरात भाषेचा प्रमुख अडथळा आहे. संगणकाचा ९५ टक्के वापर हा इंग्रजीतून होतो. देशातील ५ टक्के जनतेला इंग्रजी कळते. त्यामुळे उरलेल्या ९५ टक्के नागरिकांकडे संगणक पोचत नाही. एचपी लॅब्सतर्फे संभाषणाच्या आधारावर संगणकाचा वापर करण्याचे प्रयोग सुरु आहेत. त्यात काही अडचणी भेडसावत आहेत. 'र', 'ल', 'ळ' अशा अक्षरांचे उच्चार प्रत्येक जण वेगळा करतो. त्यामुळे स्वयंचलित संभाषण ओळख (ॲटोमॅटिक स्पीच रेकग्निशन) पद्धती संगणकाला शक्य होत नाही. त्यातूनही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ही पद्धत यशस्वी झाल्यास जगभरातील कोणत्याही भाषेत संगणक वापरणे सोयीचे होईल. दूरध्वनी किंवा ध्वनिवर्धकाद्वारे थेट संभाषण होते, तसाच वापर संगणकाद्वारे करणेही शक्य आहे.

## दूरचित्रवाणीसारख्या माध्यमाच्या वाचनसंस्कृतीवर मोठा परिणाम

लेखक, वाचक, प्रकाशक, संपादक यांना जोडणाऱ्या 'शब्दमित्र' या चळवळीच्या 'भेट प्रकाशकांची' उपक्रमांतर्गत 'ग्रंथाली'चे दिनकर गांगल, मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता आणि उत्कर्ष प्रकाशनाचे सु. वा. जोशी या प्रकाशकांना एकत्र आणण्यात आले. डॉ. मा. प. मंगुडकर व वात्रटिकाकार रामदास फुटाणे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. लेखक डॉ. आनंद यादव, डॉ. कुमार सप्तर्षी, समीक्षक शंकर सारडा, मो. गो. धडफळे, मृणालिनी जोगळेकर, वीरेंद्र चित्राव, सुधाकर अनवलीकर, संगीता जोशी आदी या वेळी उपस्थित होते. प्रकाशकांच्या नजरेतून आजचे साहित्य, वाचनसंस्कृतिविषयक निरीक्षणे आणि बदल, लेखकांकडूनच्या अपेक्षा यावर या वेळी प्रकाशकांनी मतप्रदर्शन केले.

दूरचित्रवाणीच्या आजच्या जमान्यात पुस्तकांच्या खपाचा अंदाज चुकू लागल्याचे सांगतानाच, त्यांच्या वाढत्या किंमतीमुळे वाचकांना आवड असूनही पुस्तके विकत घेत येत नाही, असे सु. वा. जोशी म्हणाले. साप्ताहिके आणि वर्तमानपत्रे ही पुस्तकांना मारक ठरली असून, प्रकाशन व्यवसाय वाढेल असे वाटत नाही, अशी शंका त्यांनी व्यक्त केली, तर हा व्यवसाय उत्तम असून तो खूपच चांगला चालू असल्याचे मत श्री. मेहता यांनी मांडले. भविष्यातही या व्यवसायामुळे काही अडचणी येतील असे वाटत नाही, पण सरकारची मदतही हवी. व्यक्तिगत खरेदीबरोबर संस्थांचीही पुस्तक खरेदी घसरल्याने गेल्या दोन-तीन महिन्यांत प्रकाशकांत चिंतेचे वातावरण आहे असे गांगल यांनी सांगितले. पुस्तकांची खरेदी वाढत असली, तरी ती विरंगुळ्यासाठी होत असल्याने वाचन मंदावत असल्याचे ते म्हणाले. हजारो वर्षे श्रोता असलेला व गेल्या २०० वर्षापासून वाचक बनलेला माणूस आता दहा-बारा वर्षापासून प्रेक्षक बनतोय, ही आजची खरी भीती असल्याचे श्री. फुटाणे यांनी सांगितले.

मराठीचा वाचकवर्ग शहरात जवळजवळ संपलेला आहे. मराठी साहित्याचे भवितव्य खरे खेड्यात असल्याचे प्रतिपादन डॉ. यादव यांनी केले. खेड्यातील हा वाचकवर्ग शोधण्याची सूचना त्यांनी केली.

निव्वळ साहित्याची पुस्तके काढून प्रकाशन व्यवसाय चालेल असे वाटत नाही, असे जोशी यांनी सांगितले. नवोदित लेखकांना प्रकाशक फसवत नसून ते स्वत:च फसवून घेतात, असेही ते म्हणाले.

शब्दमित्र संस्थेच्या अध्यक्षा अंजली कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तर मनोहर सोनवणे यांनी सूत्रसंचालन केले.

## अन्य देशांतील लोकांना भारतीयांनी इंग्रजी शिकवावे

''भारतीय इंग्रजीला जगन्मान्यता मिळत आहे. त्यामुळे अन्य विकसनशील देशांतील लोकांना ही भाषा शिकविण्यासाठी आपण जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत,'' असे मत हैदराबाद येथील सेंट्रल इन्स्टिट्यूट इंग्लिश अँड फॉरेन लँग्वेजेसचे माजी कुलगुरू डॉ. प्रमोद तलगेरी यांनी व्यक्त केले.

'अकौस्टिक्स इंजिनिअर्स'ने काढलेल्या इंग्रजी भाषेच्या उच्चारशास्त्रावरील (फोनेटिक्स) अभ्यासाच्या ध्वनिफितींचे प्रकाशन त्यांनी केले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. राम ताकवले अध्यक्षस्थानी होते. केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर आपले इंग्रजी उच्चार सुधारू इच्छिणाऱ्यांसाठी २४ ध्वनिफितींचा संच पुणे विद्यापीठातील इंग्रजी विभागाच्या मदतीने तयार करण्यात आला आहे.

डॉ. तलगेरी म्हणाले, ''इंग्रजीतील शब्दांचे उच्चार चुकीच्या पद्धतीने होत असतील तर ते सुधारले पाहिजेत; मात्र मूळ उच्चारांप्रमाणे आपले उच्चार असावेत असा आग्रह धरू नये. भारतात ही भाषा सर्वत्र बोलली जात असली तरी ती आपली मातृभाषा नाही. इंग्रजीतून संवाद साधतानाही भारतीय मातृभाषा डोकावत असते. 'भारतीय इंग्रजी' चुकीची नाही. उलट तिला जगन्मान्यता मिळत आहे. अनेक विकसनशील देश इंग्रजीसाठी भारताकडे पाहत आहेत. इंग्रजांनी दिलेला हा भाषिक वारसा आपल्यासाठी आता एक साधनसंपत्ती बनत आहे. तिचा लाभ आपण घेतला पाहिजे आणि परदेशातील लोकांना इंग्रजी शिकविण्यासाठी व्यापक कार्यक्रम हाती घेतला पाहिजे.''

आधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्याने शिक्षण लोकांपर्यंत नेता येणे आता शक्य असून त्यासाठी पावले उचलण्याची गरज आहे, असे मत डॉ. ताकवले यांनी व्यक्त केले.

पुणे विद्यापीठाचे इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. श्रीधर गोखले, डॉ. प्रशांत सिन्हा, कला शाखेचे अधिष्ठाता डॉ. अशोक थोरात, जर्मन भाषेचे व्याख्याते डॉ. विजय नेऊरगावकर, इंग्रजी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. भालचंद्र वाळके, डॉ. प्रेम जेकब, चेन्नई येथील डॉ. प्रेमलता राजन आदींनी आपले विचार व्यक्त केले.

## मराठी रत्न पुरस्कारांचे वितरण

''इंग्रजी ही ज्ञानभाषा असली, तरी मातृभाषा मराठीकडे दुर्लक्ष करता कामा नये. मराठीसाठी आपण आग्रही असायला हवे,'' असे पुण्याच्या महापौर दीप्ती चौधरी यांनी सांगितले.



मराठी भाषा संवर्धन प्रतिष्ठानतर्फे त्यांच्या हस्ते ज्येष्ठ वृत्तनिवेदिका सुधा नरवणे, 'सकाळ'चे सहसंपादक प्रभाकर खोले, मॉड्युलर सिस्टिम्सच्या तांत्रिक संचालिका मीना जोशी, चारुहास पंडित, प्रभाकर वाडेकर यांना 'मराठी रत्न' पुरस्कार देण्यात आला. प्रत्येकी पाच हजार रुपये रोख व सन्मानपदक असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

मराठी माध्यमाच्या शाळांमधून इंग्रजी चांगल्या रीतीने शिकवले गेले पाहिजे, म्हणजे इंग्रजीसंदर्भातील न्यूनगंड निर्माण होणार नाही. साहजिकच मराठी माध्यमाचा आग्रह पालकही धरू लागतील. अस दीप्ती चौधरी यांनी सांगितले. सुधा नरवणे म्हणाल्या, ''आकाशवाणीवरची मराठी बातमीपत्रे लोकप्रिय होऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आम्ही पोचलो. यात माझ्याबरोबरच्या सहकाऱ्यांचाही सहभाग होता.''

श्री. खोले म्हणाले, ''विज्ञानाची मराठीतून माहिती देण्याचा प्रयत्न बारा-तेरा वर्षापूर्वी सुरू केला. या प्रयत्नांची कुणी दखल घेत आहे, याचाच आनंद झाला. सर्वसामान्य वाचकांपर्यंत विज्ञान व वैज्ञानिक दृष्टी पोचवण्यासाठी 'सकाळ'ने तेरा वर्षापूर्वी स्वतंत्र पुरवणी सुरू केली. आर्थिक विषयांची मराठी माणसात रुची वाढावी यासाठी 'अर्थमंथन' हे नियतकालिक सुरू केले. या दोन्ही प्रयत्नांमध्ये नव्या नव्या लेखकांनी साथ केली.'' संस्थेचे अध्यक्ष प्रवीण वाळिंबे यांनी स्वागत केले.

## नाट्यसंहिता सादर करताना वाचिक अभिनय महत्त्वाचा

कोणतीही नाट्यसंहिता रंगमंचावर सादर करताना वाचिक अभिनय अत्यंत महत्त्वाचा असतो. नाटक यशस्वी होण्यात संवादफेक अर्थात वाचिक अभिनयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे,'' असे ज्येष्ठ नाट्यकर्मी पं. सत्यदेव दुबे यांनी सांगितले.

पुण्यातील समन्वय या नाट्यसंस्थेतर्फे राजाभाऊ नातू यांच्या स्मृतीनिमित्त नाट्यकार्यशाळेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले.

कार्यशाळेत राज्यभरातून सुमारे पंचाहत्तर प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यांना पं. दुबे यांनी प्रामुख्याने नाटकातील वाचिक अभिनय व देहबोली याबाबत मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, ''आवाजातील लय, सुस्पष्टता, शब्दोच्चार हे प्रभावी सादरीकरणासाठी खूप महत्वाचे ठरतात. त्यासाठी विचार सुस्पष्ट असावेत म्हणजे उच्चार आपोआप स्पष्ट व खणखणीत येतात. उत्तम सादरीकरणासाठी आत्मविश्वास गरजेचा असतो. निराशावाद, भीतीची भावना यांच्यावर मात करता आली पाहिजे.''

नाट्य सादरीकरणात देहबोलीचे महत्त्वही खूप असते. रंगमंचावरील अभिनय कृत्रिम असला तरी सत्याचा आभास निर्माण करणारा असला पाहिजे. समोरील घटना खरीखुरी, वास्तवात घडते आहे, असे प्रेक्षकांना वाटले पाहिजे. त्यांनी संवादफेक, आवाजाची पट्टी, 'फोकस' आदी बाबींवर चर्चा केली.

एक ठराविक संहिता निवडून त्यावर प्रत्येक प्रशिक्षणार्थीने संवाद व नाट्य विकसित करण्याचा प्रयोगही (इम्प्रोवायझेशन) या वेळी घेण्यात आला.

## 'जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहायला हवे'

आपले आयुष्य ही परमेश्वराने दिलेली देणगी आहे. नेहमी सकारात्मक दृष्टीने आचरण करून इतरांनाही आनंद देण्याचा प्रयत्न करणे ही आपली जबाबदारी आहे. आजवरच्या आयुष्यात मी हेच यथाशक्ती आचरण्याचा प्रयत्न केला, असे मनोगत जुन्या पिढीतील लेखिका चंद्रा कर्नाटकी यांनी व्यक्त केले.

पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या महिला व्यासपीठातर्फे त्यांचा सत्कार श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष शेणई यांच्या हस्ते करण्यात आला. सरचिटणीस प्रकाश भोईटे, संध्या टाकसाळे, सीमा देशपांडे इ. उपस्थित होते.

हिंगणे येथील महिलाश्रमात राहणाऱ्या चंद्राताई आज वयाच्या ९७व्या वर्षीही उत्साही, आनंदी आहेत. सकारात्मक, विधायक दृष्टीने जगलेले क्षण हेच माझ्या निरोगी दीर्घायुष्याचे रहस्य आहे, असे त्यांनी म्हटले, त्याची सत्यता त्यांच्याकडे पाहताच पटते.

स्वत:ची कामे स्वत: करणे मला आवडते, असे सांगणाऱ्या चंद्राताई गेल्या शतकभरातील महत्त्वपूर्ण घटनांच्या साक्षीदार आहेत. वडिलांच्या फिरतीच्या नोकरीमुळे घरीच शिक्षक नेमून ६वीपर्यंतचे शिक्षण झाले. मग मी अण्णा कर्वे यांच्या शाळेत राहिले. दिनकर कर्वे हा माझा बालमित्र होता. नंतर हुजूरपागेतून मॅट्रिक झाले. १९२६ साली संस्कृत व इंग्रजी विषय घेऊन पदवी मिळवली. १९२९ साली एम. ए. पूर्ण केले आणि लंडनला जाऊन टीचर्स डिप्लोमा, डीएचई मिळवून परत आले आणि मुंबई प्रांतात इन्स्पेक्ट्रेस ऑफ गर्ल्स स्कूल या पदावर मी रुजू झाले. डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन या पदावरून १९६१ साली निवृत्त झाले. जितकी वर्षे मी नोकरी केली त्याहून अधिक वर्षे पेन्शन घेते आहे. असे त्यांनी मोकळेपणाने सांगितले.

पुरुषांची ताबेदारी नको आणि समाजसेवाच करावी, असे ठरविल्याने अविवाहित राहण्याचा निर्णय घेतला, असे सांगून त्या म्हणाल्या, ''चारचौघांसारखेच आयुष्य मी जगले. सारे जग ही देवाची निर्मिती आहे. त्याने सर्व चांगलेच निर्माण केले आहे. त्यात वेडेवाकडे जे घडते त्याला आपण जबाबदार आहोत. आपली दृष्टी जोडण्याची हवी, तोडण्याची नसावी. साध्या घटना काय अथवा जागतिक शांततेचा प्रश्न काय तोडू नका, सोडवा, हेच सूत्र मला महत्त्वाचे वाटते. धैर्याने, चिकाटीने संघर्ष सोडवण्याचे प्रयत्न, तशी ओढ हवी. कारण नसताना दुसऱ्याला त्रास, दु:ख देण्याची आपली वृत्ती नसावी. दुसऱ्याला त्याच्या इच्छेविरुद्ध काही करायला लावणे हा मी अन्याय समजते. इतरांना क्षुल्लक समजणे, मला सहन होत नाही. आपल्याला आनंद मिळवण्यासाठी इतरांच्या सुखावर अतिक्रमण करणे मला पटत नाही. म्हणून साऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण करणाऱ्या गोष्टी जतन करणे, हे कर्तव्य करत राहिले पाहिजे.''

''देवाने आपल्याला ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रियांच्या रूपाने महान शक्ती दिल्या आहेत. त्यांची योग्य मशागत करून सर्व तऱ्हेच्या प्रदूषणापासून ती मुक्त ठेवणे, हे आपले काम आहे. वाणी ही अशीच प्रभावी, व्यापक पण सूक्ष्म शक्ती आहे. तिचा वापर जपून करायला हवा. या साऱ्या शक्तीची अंतस्थ जाणीव ठेवणारा तोच आत्मा समजून आपल्या कृती तपासत राहणे, हेच सार्थक आहे,'' असेही त्या म्हणाल्या.



## चोखोबांवरील तुकारामांचे अभंग

*'शंभरा लोकात सद्‌गुणी ऐका तुका म्हणे चोखा पंढरीचा'*

संत तुकाराम महाराजांचा संत चोखा मेळा यांच्या स्तुतिपर अभंग प्रथमच सापडला आहे. मौखिक परंपरेने जपलेला, पण आता विस्मृतीत गेलेला हा अभंग एका बाडात गवसला आहे.

तुकाराम महाराजांचे चोखोबांचा उल्लेख असलेले अभंग ज्ञात आहेत.

*'पवित्र ते कुळ पावन तो देश, जेथे हरिचे दास जन्म घेती'*

किंवा 'उंचनिच काही नेणे हा भगवंत' या अभंगात तुकोबांनी अन्य संतांबरोबर चोखा मेळा यांचा उल्लेख केला आहे. पुणे येथील डहाणूकर कॉलनीतील प्रकाश घाटपांडे यांच्याकडे असलेल्या बाडात चोखोबांची स्तुती करणारा स्वतंत्र अभंग मिळाला आहे. घाटपांडे यांनी भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला देण्याकरिता हे बाड वा. ल. मंजूळ यांच्याकडे सुपूर्द केले. ते बाड अभ्यासताना श्री. मंजुळ यांना हा नवा अभंग आढळला. जुन्नरी जाड कागदाच्या बावन्न पानांच्या या बाडात तुकोबांचे २०४ अभंग आहेत. 'सुंदर ते ध्यान' या नमनाच्या अभंगाने बाडाची सुरवात होते, तर 'हेचि दान देगा देवा' या तुकाराम महाराजांनी मागितलेल्या पसायदानाने शेवट होतो. या बाडात १४३ क्रमांकावर चोखोबांची स्तुती आहे. ती अशी :

'रायांचे सीपाई हाजाराचे बारा लाखाचा मोहोरा प्राणी येक
सवा रुपयाची येती पाच मोती हाजाराची येती जोडी येक
रुपयाच्या कवड्या मध्ये भरे गोणी मोहोर बांधुनि पदरी न्यावी
शंभरा लोकात सद्‌गुणी ऐका तुका म्हणे चोखा पंढरीची' - *गीतापंचरत्न*

भांडाकर संस्थेला डॉ. दिवाकर गणपती दक्षिणदास यांनी दिलेली तीन हस्तलिखितेही वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

'गीतापंचरत्न' या हस्तलिखितात भगवद् गीता, विष्णुसहस्त्रनाम, भीष्मस्तवरात, अनुस्मृती व गजेंद्रमोक्ष हे पाच धार्मिक ग्रंथ आहेत. नित्य वाचनासाठी हे ग्रंथ डॉ. दक्षिणदास यांच्या घरात तीन पिढ्या होते. या हस्तलिखितात सव्वीस मोठी व तीसहून अधिक छोटी चित्रे अंतर्भूत आहेत. प्रत्येक अध्यायात कृष्ण अर्जुनाला उपदेश करत असल्याची वेगवेगळ्या भावमुद्रांमधील चित्रे आहेत. ही चित्रे मध्य प्रदेशातील आदिवासी शैलीत आहेत. वस्त्रआभूषणे व अलंकार कमी, तसेच डोळ्यांच्या कडा चेहऱ्याबाहेर आहेत. जुन्नरी पिवळसर कागदावर प्रत्येक पानावर नक्षीकाम करून व सोनेरी वर्ख देऊन हे हस्तलिखित सजवण्यात आले आहे.

## कवी सौमित्रला गुलजार यांची दाद

गालिब ! मला दु:खाएवढं मोठं व्हायचंय
भोवतालच्या अंधाराला वणवा नाही लागला तरी चालेल
माझ्या शब्दांचे दिवे तरंगताहेत त्यावर
एवढंच मला पाहायचंय..

असं म्हणणाऱ्या कवी सौमित्रच्या पहिल्यावहिल्या 'आणि तरीही मी' या काव्यसंग्रहाचं प्रकाशन कवी गुलजार यांच्या हस्ते कर्नाटक संघाच्या सभागृहात झालं. पॉप्युलर प्रकाशनाने प्रसिद्ध

केलेल्या या संग्रहात सौमित्र उर्फ किशोर कदम यांच्या तब्बल २०० कविता समाविष्ट आहेत. गुलजार यांच्याबरोबर कवी शंकर वैद्य यांनीही केलेलं सौमित्रचं निर्व्याज कौतुक आणि सौमित्रने पेश केलेल्या व मिलिंद जोशी, मिलिंद इंगळे, मनीषा जोशी, कौशल इनामदार यांनी गायलेल्या कवितांना रसिकांनी दिलेली दाद यामुळे समारंभही काव्यात्म झाला.

कवी-गीतकार गुलजार यांनी गालिब हा सौमित्र आणि आपल्यातला समान दुवा असल्याचे यावेळी सांगितले. गालिबप्रमाणे जो दु:खाला तीव्रतेने भिडतो आणि ते सहन करतो तोच मोठा कवी होतो, असं सांगून ते म्हणाले, ''सौमित्र हा चलाख नाटककार आहे. तो आपल्या कवितेतही नाट्य भरतो. अगदी सहजपणे तो दुसऱ्याला जखम करून जातो, पण त्याची वेदना मात्र स्वत: भोगतो.''

त्यांनी सौमित्रच्या अनेक कवितांच्या तुकड्यांचे हिंदी अनुवाद ऐकवून त्यातल्या नाजूक जागा दाखवल्या. त्याच्या कवितेत सिनेमा, नाटक या क्षेत्रातील परिभाषा अनुभवाच्या मुशीतून येते, त्यातून त्याचं आयुष्य पाझरत राहतं आणि ही गोष्ट फार कमी कवींच्या कवितांमधून दिसून येतं, असं त्यांनी सांगितलं.

यावेळी त्यांनी सौमित्रच्या कवितेचं रसग्रहणही केलं. तत्पूर्वी, सौमित्रच्या काव्यवाचनाने भारावून जाऊन त्याच्या कविता प्रसिद्ध करण्याची अनावर इच्छा झाल्याचे प्रकाशक रामदास भटकळ यांनी सांगितले. कवी अरुण म्हात्रे यांनी सूत्रसंचालन केलं.

## ग्रंथांचा खप वाढतो आहे पण चिंतन-मनन कमी झाले आहे

पुस्तके हा प्रतिभावंत आत्म्याचा श्वास असतो. त्याच्यामुळे मन व जीवन समृद्ध होते. आज ग्रंथालये, लेखक-पुस्तके-वाचक यांच्या संख्येत वाढ झाली असली तरी ग्रंथांचे चिंतन व मनन होत नसल्याने आम्ही रानटी संस्कृतीकडे वळत आहोत, अशी खंत प्रख्यात साहित्यिक व विचारवंत डॉ. निर्मलकुमार फडकुले यांनी व्यक्त केली. जळगावच्या वल्लभदास वालजी जिल्हा वाचनालयाचा शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षाचा सांगतासमारंभ १ जुलै रोजी झाला. कविवर्य ना. धों. महानोर, ॲड. अच्युत अत्रे, 'देशदूत'चे संपादक सुभाष सोनवणे आदी उपस्थित होते.

वाचनालये हा आपल्या संस्कृतीचा आधारस्तंभ आहे. साहित्यिकांची स्वप्ने या ग्रंथातून, पानातून व्यक्त झालेली असतात. ग्रंथ वाचनाची नशा ही वेगळीच असते. ती आयुष्यभर उतरत नाही. आजच वाचन थांबल्याची खंत वाटते. ग्रंथांच्या संख्येत वाढ झाली. शब्द वाचले जातात पण त्यांचा भाव समजावून घेतला जात नाही. विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमातील पुस्तके शिकवण्यापेक्षा शिक्षकांनी विद्यार्थ्यांना त्या पुस्तकाच्या आत्म्याजवळ घेऊन जावे. मधुसूदन हरी दामले, प्रा. म. मो. केळकर, प्रा. डी. डब्ल्यू. जोशी यांचा वाचक म्हणून प्रातिनिधिक सत्कार करण्यात आला. वाचनालयाचे कार्याध्यक्ष ॲड. सुशील अत्रे यांनी वाचनालयाच्या कामगिरीचा आढावा घेतला.

## राज्य पातळीवर अल्फा एकांकिका स्पर्धा

नवोदित गुणी कलाकारांना उत्तेजन देण्यासाठी अल्फा टिव्ही मराठी 'अल्फा महाकरंडक आंतर-महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा' यंदापासून राज्यात आठ केंद्रावर घेणार आहे.

गेल्या वर्षी मुंबई व पुणे येथे स्पर्धेला उदंड प्रतिसाद मिळाला. मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, नागपूर, कोल्हापूर व सिंधुदुर्ग या केंद्रांवर यंदा ही स्पर्धा होणार आहे. या



प्रत्येक केंद्रातून एक उत्कृष्ट एकांकिका, लेखक, दिग्दर्शक, अभिनेता, अभिनेत्री यांना पारितोषिके देण्यात येतील. उत्कृष्ट ठरलेल्या आठ एकांकिकांची उपांत्य फेरी मुंबईत होईल. त्यातून तीन एकांकिकांची निवड अल्फा गौरव पुरस्कारासाठी करण्यात येईल.

उत्कृष्ट अभिनेता व अभिनेत्री यांना अल्फा गौरव पुरस्काराबरोबर अल्फा टिव्ही मराठीवरील मालिकांमधून झळकण्याची संधी देण्यात येईल. प्राथमिक फेरीतील आठ केंद्रांवरील स्पर्धांवर आधारित कार्यक्रम वाहिनीवर प्रसारित करण्यात येणार आहेत.

या उपक्रमातून राज्यभरात सहभागी होणाऱ्या नवोदित कलावंतांची तपशीलवार माहिती अल्फा वाहिनी गोळा करणार असून वाहिनीवर येणाऱ्या मालिका व कार्यक्रमांमध्ये त्यातील योग्य कलावंतांना स्थान देण्याचा वाहिनीचा उद्देश आहे.

## तुकारामांचे सर्व अभंग आता राष्ट्रभाषेत

पुण्यातील एक वयोवृद्ध तुकारामभक्त श्रीराम केशव शिकारखाने यांनी महाराजांच्या सर्व म्हणजे ४६०५ रचनांचे हिंदी पद्यामध्ये भाषांतर केले आहे. हे कार्य आता 'अभंगसागर' या ८०० पानी पुस्तकाच्या रूपाने येऊ घातले असून तुकारामांच्या टपाल तिकिटाबरोबर पुस्तकाचेही प्रकाशन संबंधित खात्याचे मंत्री प्रमोद महाजन यांच्या हस्ते व्हावे असा प्रयत्न सुरू आहे. शालेय शिक्षणमंत्री रामकृष्ण मोरे यांनीही या प्रकल्पात रस दाखवला आहे. हा प्रकल्प सुमारे चार लाख रुपयांचा आहे.

दौंड येथील शेठ ज्योतिप्रसाद विद्यालयातून हिंदी शिक्षक म्हणून निवृत्त झाल्यावर शिकारखाने यांनी वेळ घालवण्यासाठी हे काम हातात घेतले. मधल्या काळात दोन शस्त्रक्रियांना तोंड द्यावे लागले, त्यामुळे काम तडीस जाण्यात सुमारे १७/१८ वर्षे गेली संस्कृतनिष्ठ हिंदीपेक्षा सर्वसामान्य माणसाला समजतील असे शब्द योजायचे ही भूमिका होती. रूपांतर करताना अर्थ आणि गेयता यावर भर दिला. काम पूर्ण झाल्यावर पुणे विद्यापीठाच्या हिंदी विभागाचे प्रमुख आनंदप्रसाद दीक्षित यांनी ते पाहिले. संत साहित्याचे अभ्यासक सदानंद मोरे यांनी प्रस्तावना लिहिण्याचे मान्य केले.

शिकारखाने हे २५ वर्षे तुकारामांच्या रचना वाचत होते. मात्र, आपण संत साहित्याचे अभ्यासक नाही किंवा तुकारामांच्या साहित्यावर प्रभुत्व मिळवलेले नाही, असे ते सांगतात.

## साहित्यभूषण परीक्षेत श्रीकांत लघाटे प्रथम

कुसुमाग्रज प्रतिष्ठान संचालित साहित्यभूषण २००२ परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे.

गोरेगाव (मुंबई) येथील श्रीकांत लघाटे ५०० पैकी ४०२ गुण मिळवून प्रथम आले. त्यांना एक हजार रुपयांचा इंद्रायणी पुरस्कार, पुणे येथील भाग्यश्री भावसार यांना दुसरा ७५० रुपयांचा गोदामाता, तर नाशिकच्या सुलभा शेरताटे यांना ५०० रुपयांचा कृष्णामाई पुरस्कार जाहीर झाला आहे.

## काव्यरूपात कंपनी कायद्याची छोटी पुस्तिका

कंपनी कायद्यातील क्लिष्ट व रूक्ष माहिती काव्य स्वरूपात 'प्रा. लि. नवनीतम्' (एवं खाजगी कंपनी विधिगीता) या नावाने प्रकाशित करण्यात आली आहे.

पुण्यातील ज्येष्ठ कंपनी सेक्रेटरी महेश रिसबूड यांनी ही पुस्तिका लिहिली असून त्यात कंपनी कायद्याचे '१८अध्याय' आहेत. कंपनी कायद्याच्या महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश या पुस्तिकेत आहे.

कंपनीची स्थापना का आवश्यक आहे, या पहिल्या अध्यायापासून पुस्तकास आरंभ करण्यात आला आहे. कंपनी अशी स्थापन करायची, नोंदणीकृत कार्यालयासंबंधीच्या तरतुदी, भांडवल, मुदतठेवी, कर्जबोजा, सभासदांचे अधिकार, वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक, लेखापरीक्षक, सचिवपद तसेच कंपनी कशी विसर्जित करायची या महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश या पुस्तकात आहेत.

या पुस्तिकेची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये करण्यात आली आहे. या पुस्तकाची किंमत २५ रुपये आहे. प्रकाशक : रिलाय कॉर्पोरेट एड, अन्नपूर्णा, मॉडेल कॉलनी, १०३४, शिवाजीनगर, कॅनॉल रोड, पुणे ४११०१६.

### ग्रंथांच्या प्रती पाठविण्याचे आवाहन

राज्यातील सरकारमान्य सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथसंग्रह समृद्ध करण्यासाठी राजा राममोहन रॉय प्रतिष्ठान, कोलकता व महाराष्ट्र सरकारच्या ग्रंथालय संचालनालयाला २००१ मध्ये प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांची खरेदी करावयाची आहे. त्यासाठी प्रकाशकांनी २००१ या वर्षात प्रसिद्ध केलेल्या ग्रंथाची एकेक प्रत ग्रंथालय संचालक, महाराष्ट्र राज्य, नगरभवन, मुंबई ४०००२३ येथे

### इंग्रजीसाठी तरंगते तक्ते

महाराष्ट्र सरकारने यंदापासून इयत्ता तिसरी व चौथीसाठी 'माय इंग्लिश बुक थर्ड' हे पाठ्यपुस्तक अभ्यासक्रमासाठी ठेवले आहे. त्या दृष्टीने ताडदेवच्या विजय क्रीडा सेवा मंडळाने ३३ बाय २२ सेंमी आकाराचे ३० निरनिराळे तरंगते तक्ते तयार केले आहेत. ३० तक्त्यांचा हा संच हवा असल्यास मुरलीधर अनंत सावंत-भोसले, रहीमतबाई बिल्डिंग क्रमांक २, ताडदेव, मुंबई ४०००३४ या पत्त्यावर संपर्क साधावा.

### भांडारकर प्राच्य विद्या संशोधन संस्थेकडे सरकारचे दुर्लक्ष ?

वेदांपासून आधुनिक साहित्यापर्यंत सुमारे २८ हजार दुर्मिळ हस्तलिखितांचा अमोल ठेवा गेली ८५ वर्षे जतन करणाऱ्या भांडारकर प्राच्यविद्या संशोधन संस्थेला, ग्रंथरक्षणेसाठी किमान २० लाख रुपयांची गरज आहे. वेळोवेळी मागणी करूनही ही रक्कम राज्य सरकारने अद्याप दिली नाही. तसेच दरवर्षी देण्यात येणारा ८० हजार रुपयांचा देखभाल निधीही गेल्या आर्थिक वर्षात पाठवलेला नाही.

देशात प्राच्यविद्या शास्त्राची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या रामकृष्ण गोपाळ भांडारकरांनी सहा जुलै १९१७ रोजी स्थापन केलेल्या या संस्थेने ८५ व्या वर्षात पर्दापण केले. देशा-परदेशातील अनेक संशोधक येथील हस्तलिखितांवर व पुस्तकांवर संशोधन करतात. महाभारतावरील संशोधन व पदव्युत्तर विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे कामही येथे चालते.

१८६० च्या सार्वजनिक धर्मादाय न्यास कायदा कलम २१ अन्वये संस्थेची नोंद झाली असल्याने राज्य सरकारचे प्रतिनिधी संस्थेच्या कारभारात भाग घेतात. हस्तलिखितांसाठी वातानुकूलित यंत्रणा, नवी इमारत, निवासव्यवस्था, सुसज्ज वस्तूसंग्रहालय आणि सव्वा लाखाहून अधिक पुस्तके असणाऱ्या ग्रंथालयाचे आधुनिकीकरण व संगणकीकरण करण्याचे प्रस्तावही निधीअभावी राज्य



सरकारच्या उच्च शिक्षण विभागाकडे धूळ खात पडले आहेत.

संस्थेच्या ३४० प्रकाशनांच्या विक्रीवर संस्थेला प्रामुख्याने अवलंबून राहावे लागत आहे, असे संस्थेचे मानद सचिव प्रा. एस. जी. धडफळे म्हणाले.

राज्य सरकार मदत करते असे कारण सांगून केंद्र सरकारनेही संस्थेकडे पाठ फिरवली आहे. एकेकाळी महात्मा गांधी, वल्लभभाई पटेल आणि दलाई लामांसारख्या दिग्गजांनी संस्थेस भेट देऊन चाललेल्या कामाची प्रशंसा केली होती. ज्येष्ठ उद्योगपती जेआरडी टाटांनी आर्थिक मदतीचा हातही पुढे केला होता.

सरकारकडून येणारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्याची २.७० लाखांची रक्कम अद्याप मिळालेली नाही. अखंड संशोधनाचे व्रत घेतलेल्या पाच ज्येष्ठ विद्वानांना संस्था कोणताचा आर्थिक मोबदला देऊ शकत नाही. हस्तलिखितांच्या देखभालीसाठी काही जंतूनाशके वापरण्यात येतात. पुण्याच्या हवेतील सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण हस्तलिखितांसाठी अनुकूल असले तरी नजीकच्या भविष्यात त्यांची शास्त्रशुद्ध पद्धतीने जतन करणारी अत्याधुनिक यंत्रणा असणे गरजेचे आहे. मुंबईच्या एलफिन्स्टन महाविद्यालयातून अगोदर डेक्कन महाविद्यालयात व तेथून भांडारकर संस्थेत स्थलांतरित झालेल्या या हस्तलिखितांपैकी १८ हजार हस्तलिखिते तत्कालीन ब्रिटिश सरकारने दिली होती व उर्वरित भांडारकर संस्थेने मोठ्या चिकाटीने जमा केली आहेत. सुदैवाने १८ हजार हस्तलिखितांच्या मायक्रोफिल्मिंगचे काम दिल्लीच्या 'इंदिरा गांधी नॅशनल सेंटर फॉर द आर्टस' या संस्थेने गेल्या दशकात पूर्ण केले आहे. या हस्तलिखितांची माहितीपूर्ण उत्तम सूची एस. एम. कात्रे, पी. के. गोडे आणि एस. के. बेलवलकर यांनी तयार केली आहे. अशा परिस्थितीत मूळ हस्तलिखिते पुढच्या अभ्यासक पिढ्यांसाठी सुस्थितीत राहाणे गरजेचे आहे.

### 'क्लासिक्स ऑफ वर्ल्ड लिटरेचर' मध्ये संत तुकारामांचे अभंग

अमेरिकेतील 'ओरिएंट लॉंगमन' या विख्यात प्रकाशन संस्थेने 'क्लासिक्स ऑफ वर्ल्ड लिटरेचर' या आगामी पुस्तकामध्ये तुकारामाच्या निवडक १२ अभंगांचा समावेश केला आहे.

कवी दिलीप चित्रे यांनी इंग्रजीत अनुवादित केलेल्या निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, तुकाराम यांच्यासह बहिणाबाई यांच्यापर्यंतच्या निवडक अभंगांचा संग्रहही प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

तुकोबांच्या अभंगांना वैश्विक पातळीवर प्रतिसाद मिळत आहे. इंटरनेटवर तुकोबांवर सात ते आठ संकेतस्थळेही आहेत. इंग्रजीसह इटालियन, जर्मन, फ्रेंच व अन्य पाश्चात्य भाषांमध्ये मिळून सुमारे एक हजार लेख वाचण्यास उपलब्ध आहेत. चित्रे यांच्या 'सेज तुका' या तुकोबांच्या अभंगावरील इंग्रजी पुस्तकाचा यापूर्वी जर्मन, स्पॅनिश, पोलिश आणि डच भाषांत अनुवाद झाला आहे. तुकोबा हे नित्शे व कन्फ्यूशियस यांसारख्या जर्मन व चिनी तत्ववेत्यांच्या तोडीचे विचारवंत होते, हे सर्वमान्य होऊ लागले आहे. जगाला अभिमानाने सांगावे असे हे आपले सांस्कृतिक धन आहे. गेली १२ वर्षे तुकोबांच्या पालखीबरोबर पंढरीच्या वारीत सहभागी होणाऱ्या चित्रे यांच्या 'ॲन ॲन्थॉलॉजी ऑफ वारकरी पोएट्री' या आगामी पुस्तकात निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव, मुक्ताबाई, जनाबाई, नामदेव, चोखामेळा, सावतामाळी, गोरा कुंभार, एकनाथ, तुकोबा आणि त्यांच्या शिष्या बहिणाबाई यांच्या निवडक अभंगांचा समावेश आहे. पंढरपूरला शिरताना वारीतील

पाच लाख वारकऱ्यांचा भक्तिरूप आनंद प्रचंड लाटेसारखा शिगेस पोचलेला असतो. तो अनुभव प्रत्येक मराठी माणसाने घ्यावा असाच आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य मराठीत येणार

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य येत्या दोन वर्षात मराठीत उपलब्ध होणार आहे. त्यामुळे अभ्यासकांबरोबरच सर्वसामान्य कार्यकर्त्यांनाही त्यांच्या विचारांची ओळख होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सर्व साहित्य प्रकाशित करण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री शरद पवार यांनी १९७८ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकाशन समितीची स्थापना केली. शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील या समितीचे डॉ. वसंत मून सदस्य सचिव होते. त्यांच्या कारकिर्दीत गेल्या २४ वर्षात बाबासाहेबांच्या साहित्याचे १६ खंड आणि संदर्भ साहित्याचे दोन खंड प्रकाशित झाले आहेत. प्रत्येकी १५ हजारांची आवृत्ती छापूनही बहुतेक खंडांच्या प्रती संपल्या आहेत. या खंडांना देशात आणि विदेशातही मागणी आहे. दक्षिण आफ्रिकेतील विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात पहिल्या खंडाचा समावेश आहे.

भारत सरकारने डॉ. आंबेडकर फाऊंडेशनची स्थापना करून या इंग्रजी ग्रंथांचा अन्य भारतीय भाषांमध्ये अनुवाद करण्यास प्रारंभ केला. त्यानुसार सर्व खंड हिंदीत प्रकाशित झाले आहेत. हे खंड मराठीत यावेत, अशी मागणी होती. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री दिलीप वळसे-पाटील समितीचे विद्यमान अध्यक्ष आहेत. नव्या पिढीतील संशोधक हरी नरके यांच्यावर सदस्य सचिवपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. समितीत गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर, जनार्दन वाघमारे, केशव मेश्राम, रा. सु. गवई, प्रकाश आंबेडकर, रामदास आठवले, जोगेंद्र कवाडे, लक्ष्मण माने, टी एम. कांबळे, अशोक गोडघाटे, एन. जी. कांबळे आदींचा समावेश आहे. समितीच्या गेल्या तीन महिन्यांत नियमित बैठका झाल्या. नामवंतांकडून अनुवाद करून घेतलेले पहिले सहा खंड सहा डिसेंबर २००२ पूर्वी प्रकाशित करण्याचे ठरविण्यात आले आहे. पहिल्या खंडात विविध तज्ज्ञांनी अनुवादित केलेले तेरा निबंध आहेत. खंड क्रमांक दोन ते सहा अनुक्रमे प्र. श्री. नेरूरकर, आ. ना. पेडणेकर, गौतम शिंदे, आ. ह. साळुंखे आणि प्रा. विजय कविमंडन यांनी अनुवादित केले आहेत. सात ते सोळा खंडांचे काम विविध जाणकारांकडे अनुवादासाठी सोपविले आहे. खंड १७ प्रकाशित झाला होता. अठराव्या खंडाची छपाई पूर्ण होत आली असून तीन भागातील या खंडात बाबासाहेबांची ३४५ भाषणे आहेत. एकोणिसाव्या खंडात बाबासाहेबांचे लेख, संदेश, मुलाखती असे साहित्य असून त्याचे तीन भाग वर्षभरात प्रकाशित करण्यात येणार आहेत. विसावा खंड पत्रव्यवहाराचा आणि एकविसावा खंड बाबासाहेबांच्या छायाचित्रांचा असेल. एकूण २५ खंडांचा हा प्रकल्प आहे.

### हेडगेवार चित्रमालिकेचे प्रकाशन

''राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे साऱ्या समाजाचे संघटन करायचे. कोणा एका संप्रदायाचे ते नव्हते,'' असे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह मोहन भागवत यांनी सांगितले.

ग. वि. देशपांडे यांनी डॉ. हेडगेवार यांच्या जीवनावर आधारित तयार केलेल्या चित्रमालिकेच्या पुस्तकाचे प्रकाशन झाले. पुस्तकाविषयी ते म्हणाले, ''चित्रातील डॉक्टरांचे चित्रण अतिशय उपयुक्त असे आहे. डॉक्टरांना जसे आपण कल्पनेत पाहतो, तसेच ते या पुस्तकात दिसतात हे या चित्रांचे यश आहे.''

पुस्तकाचे चित्रकार वि. ग. देशपांडे यांनी मनोगत व्यक्त करताना, ही चित्रमालिका आपल्याला निर्मितीचा सर्वोच्च आनंद देणारी निर्मिती आहे. यामुळे संकल्पपूर्तीचे समाधान मिळाले आहे, असे म्हटले.

### डॉ. प्रतिमा इंगोला यांच्या नव्या कादंबरीचे प्रकाशन

विदर्भातील लेखिका डॉ. प्रतिमा इंगोले यांनी कॉलेजमधील अंशकालीन महिला प्राध्यापकांच्या अनुभवावर आधारित ही 'पार्टटाइम' ही कादंबरी लिहिली आहे. तिचे प्रकाशन शंकर सारडा यांच्या हस्ते झाले. ही कांदबरी ग्रंथविशेष प्रतिष्ठान, ८५७ शनिवार पेठ, सातारा यांनी प्रकाशित केले.

### 'ग्रहांकित' रौप्यमहोत्सवानिमित्त पंचवीस हजाराची थैली

ग्रहांकित या प्रसिद्ध ज्योतिषविषयक मासिकाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त संपादक चंद्रकांत शेवाळे यांचा पी. वाय. सी. जिमखाना मित्रपरिवार व रॉबर्टसन कॅन्सोर्टियम संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. पी. वाय. सी. जिमखान्याचे कार्याध्यक्ष श्री. कुमार ताम्हाणे यांचे हस्ते सन्मानचिन्ह व रु. पंचवीस हजाराची थैली देण्यात आली. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ उद्योजक श्री. रुपा इसरानी होते. बंधू सर्वश्री नंदकुमार राजेंद्र व मुकुंद यांनी दिलेल्या सहकार्यामुळेच ग्रहांकितला उत्तुंग यश मिळाले असल्याने शेवाळे यांनी याप्रसंगी नमूद केले. सौ. पुष्पलता शेवाळे यांचा सौ. लिलू इसरानी हस्ते सौभाग्य लेणं देऊन सत्कार करण्यात आला.

प्रसिद्ध प्रकाशक श्री. अरुण जाखडे व नंदनवन संस्थेच कार्यवाह श्री. अनिल तळेगावकर यांची गौरवपर भाषणे झाली. पी. वाय. सी. जिमखान्याचे कार्यवाह श्री. यशवंत हळबे यांनी प्रास्ताविक केले. श्री. प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केले. रॉबर्टसन कन्सोर्टियम संस्थेचे ज्येष्ठ सदस्य श्री. अरविंद खाडिलकर यांनी आभार मानले.

### 'शुभम साहित्य' आयोजित मराठी पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन

पुणे येथील 'शुभम साहित्य'च्या मराठी पुस्तकांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिक बाबा कदम यांच्या हस्ते व 'पुढारी'चे संपादक प्रतापसिंह जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

या प्रदर्शनात प्रसिद्ध लेखक व प्रकाशकांची ६० हजाराहून अधिक पुस्तके आहेत.

उद्घाटनप्रसंगी ज्येष्ठ साहित्यिक बाबा कदम व 'पुढारी'चे संपादक प्रतापसिंह जाधव यांचे स्वागत प्रदर्शनाचे संयोजक राजेंद्र ओंबासे, गणेश लोंढे, संजय हेंद्रे व रवींद्र कासार यांनी केले. उद्घाटनाच्या वेळी मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे अनिल मेहता, शाहू स्मारक भवनचे व्यवस्थापक हारुगडे आदी उपस्थित होते.




## यशवंत मनोहर यांच्या 'जीवनायन'ला इंदिरा संत पुरस्कार

इचलकरंजी येथील आपटे वाचन मंदिराच्या वतीने देण्यात येणारा इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार कवी यशवंत मनोहर (नागपूर) यांच्या 'जीवनायन' या काव्यसंग्रहाला जाहीर झाला आहे. रोख पाच हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे.

इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्टच्या वतीने देण्यात येणारा उत्कृष्ट गद्य साहित्य कृती पुरस्कार प्रकाश नारायण संत (कऱ्हाड) यांच्या 'पंखा' या साहित्यकृतीस जाहीर झाला. (५ हजार रुपये)

लक्षणीय काव्यसंग्रहासाठी 'मौनातील पडझड' (अशोक कोतवाल) व 'माझ्या आत्म्याचा चुंबकीय परिघात'(भगवान ठग) यांची निवड झाली. लक्षणीय गद्य साहित्यकृतीसाठी 'समिधा' (साधना आमटे) आणि 'तो प्रवास सुंदर होता' (के. रं. शिरवाडकर) या साहित्यकृतींची निवड झाली. (एक हजार रुपये) पद्य विभागासाठी लेखक श्रीनिवास कुलकर्णी (कऱ्हाड) व गद्य विभागासाठी प्राचार्य म. द. हातकणंगलेकर यांनी समीक्षक म्हणून काम पाहिले. १३ जुलैला ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक व आमदार प्रकाश आवाडे यांच्या उपस्थितीत पुरस्काराचे वितरण झाले.

## अक्षरनंदन शाळेला मृण्मयी पुरस्कार

प्रसिद्ध संगीतकार यशवंत देव यांच्या हस्ते 'अक्षरनंदन' शाळेला 'मृण्मयी' पुरस्कार देण्यात आला. सात हजार रुपये व गौरवपत्र असे स्वरूप असलेला पुरस्कार मुख्याध्यापिका गौरी देशमुख व वर्षा सहस्रबुद्धे यांनी स्वीकारला. गो. नी. दांडेकर यांच्या 'पडघवली' व 'पवनाकाठचा धोंडी' या कादबऱ्यांच्या अभिवाचनाच्या ध्वनीफितींचे प्रकाशन प्रसिद्ध कलावंत करुणा देव यांच्या हस्ते व 'भिल्लवीर कालिंग' या कुमार कादंबरिकेचे प्रकाशन करण्यात आले.

शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे आपले अभ्यासक्रम देशातल्या शहरी, ग्रामीण वास्तवाला सामोरे जाण्याची ताकद देणारे नाहीत. 'नैसर्गिक, सामाजिक, सांस्कृतिक विविधतेला न्याय देण्याऐवजी साच्यात बांधून घालणारी आपली पाठ्यपुस्तके आहेत. बंद खिडक्यांच्या अंधाऱ्या वर्गात हजारो मुले लिहित, वाचत आहेत. अनुदान रद्द होण्याच्या भीतीने फळ्यावर उत्तरे सोडवून दिली जात आहत. नोंदवह्या भरून नव्या योजनांच्या तांत्रिक नोंदी करण्यात शिक्षण गढून गेले आहेत. साहजिकच शाळेत नव्याने येताना मुलांमध्ये असलेली उपजत उत्स्फूर्तता, संवदेन क्षमता, विचार शक्ती, त्यांचे हसू, डोळ्यातील चमक सारे विझून जात आहे. कारण सक्षम, विचारी, सहृदयी, कुशल शिक्षक निर्माण होतील असे वातावरण राखण्यात समाज म्हणून आपण कमी पडत आहोत.''

'पोचायलाही अवघड अशा ठिकाणच्या शाळेत मुलं नेमाने येतात. ती शिकायला उत्सुक आहेत; पण शिकणे जवळजवळ कुठेच घडत नाही. वर्गाचच्या भिंतीवर मुलांची अक्षरे, चित्रे यांना जागाच नाही. पट्ट्या, छड्या, रट्टे, चिमटे या शिक्षा मिळत असूनही मुले कोणत्या तरी अनामिक आशेने शाळेत येत आहेत,' हे महाराष्ट्रातील शाळांमधील चित्र 'अक्षरनंदन' शाळेच्या माजी मुख्याध्यापिका वर्षा सहस्रबुद्धे यांनी मांडले.

दुसऱ्याचे अनुकरण न करता आपल्या क्षमता ओळखून आपल्या पद्धतीने फुला, असे यशवंत देव यांनी सांगितले. मराठी भाषा भांडण्याच्या द्वारे नव्हे, तर गाण्याच्या द्वारे टिकेल. शासन नव्हे, तर रसिक भाषा टिकवतील. त्यांनी गोनीदांचा उल्लेख 'साहित्याचे उपासक' असा केला. सांस्कृतिक तुटलेपण मुलांमध्ये येऊ नये, यासाठी आपल्या शाळेत मातृभाषेत शिक्षण दिले जाते. अभिजात साहित्यातील मूल्ये व मानवतावादी मूल्ये हातात हात घालून चालतात. मुलांच्या आंतरिक ऊर्मी विकसित करण्याची गरज असल्याची प्रचीती गोनीदांच्या चरित्रातून येते असे गौरी देशमुख यांनी सांगितले.

डॉ. विजय देव यांनी प्रास्ताविक केले. डॉ. वीणा देव यांनी पुरस्कारामागची भूमिका स्पष्ट केली. मधुरा डहाणूकर यांनी पुस्तकाविषयी माहिती दिली. मृणाल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

## रत्नाकर मतकरींना नाट्यलेखन पुरस्कार

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या नाशिक शाखेतर्फे कालिदास कलामंदिरात वि. वा. शिरवाडकर नाट्यलेखन पुरस्कार रत्नाकर मतकरी यांना, तर प्रा. वसंत कानेटकर रंगकर्मी पुरस्कार श्री. पुरुषोत्तम बेर्डे यांना प्रदान करण्यात आला. याच वेळी ज्येष्ठ अभिनेते चंद्रकांत गोखले यांचाही गौरव करण्यात आला.

मुंबईचे नगरपाल, निर्माते-दिग्दर्शक किरण शांताराम यांच्या हस्ते हा कार्यक्रम झाला. महापौर दशरथ पाटील, अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे अध्यक्ष मोहन तोंडवळकर, दिग्दर्शक जयदेव हट्टंगडी, शाखाध्यक्ष दत्तात्रय नाडगौडा, उपाध्यक्ष मधुकर झेंडे, प्रमुख कार्यवाह मुरलीधर खैरनार, कार्याध्यक्ष श्याम पाडेकर, खजिनदार सुनील देशपांडे, नाट्यलेखक जयंत पवार, प्रतिभा मतकरी, अनिता बेर्डे तसेच प्रा. कानेटकर यांचे कुटुंबीय या वेळी उपस्थित होते.

शांताराम म्हणाले, ''मतकरी यांना बालरंगभूमीसाठी खूप चांगली नाटके लिहिली. त्यांनी अशीच आणखी नाटके दिल्यास मी मदत करायला तयार आहे. तसेच प्रायोगिककडून व्यावसायिक रंगभूमीवर येण्यास उत्सुक असलेल्या कलावंतांना अडचणी येत असल्यास त्या दूर करण्यासाठी आपले सहकार्य राहील.''

रंगभूमीवर ७२, तर रुपेरी पडद्यावरील ६० वर्षांची तपश्चर्या असलेल्या श्री. चंद्रकांत गोखले यांनी नट कसा असावा आणि जिद्द किती महत्त्वाची असते, याबाबत उदाहरणांसह मार्गदर्शन केले. ते म्हणाले, मला शिकता आले नाही; पण शिक्षकांच्या भूमिका कराव्या लागल्या. सुरवातीच्या काळात त्याबाबत संकोच वाटायचा. तरीही पोटाचा प्रश्न असल्याने त्या भूमिका करीत आलो. मुळातच आपण ज्या भूमिकेत असतो, तीच थेट रसिकांच्या काळजापर्यंत भिडवायला हवी. त्यासाठी अभ्यास करावा.

पुरस्काराने आनंद झाला, त्याच जोडीला आणखी बरेच काही करायचे आहे,असा इशारादेखील

मिळाला आहे. नटश्रेष्ठ चंद्रकांत गोखले व अशोककुमार यांच्यासमवेत काम करण्याची संधी मला मिळाली, हासुद्धा आयुष्यातील पुरस्कार मानतो, अशा शब्दांत श्री. बेर्डे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मुंबईचे नाट्यक्षेत्र रंगले-गांजले आहे. पण येथे सळसळता उत्साह दिसला. स्पर्धा दर्जात्मकदृष्ट्या कशी वाढेल, या दृष्टीने काळजी वाहणारे कार्यकर्ते पाहावयास मिळाले, असे नमूद करून श्री रत्नाकर मतकरी म्हणाले, ''आम्ही समाजाकडून घेतो; परंतु आम्ही समाजाला काही देतो काय, या प्रश्नाने बेचैनी वाढते. तसेच समाजाला चुकते आहे, हे माहित असल्यानेच नाटककरांनी त्यापुढे जाऊन विविध समस्यांवरील उपाय सांगावयास हवेत.''

## डॉ. आ. ह. साळुंखे यांना मराठा भूषण पुरस्कार

अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे ज्येष्ठ विचारवंत डॉ. आ. ह. साळुंखे यांना २६ जून रोजी 'मराठा भूषण' पुरस्कार देण्यात आला. पाच हजार रुपयांचा हा पुरस्कार आहे. यापूर्वी हा पुरस्कार शशिकांत पवार, सिंधुताई सपकाळ, संगणकतज्ज्ञ विजय भटकर, एसटी कामगार संघटनेचे नेते हनुमंत ताटे यांना देण्यात आला.

हा पुरस्कार अखिल भारतीय मराठी महासंघाचे अध्यक्ष शशिकांत पवार यांच्या हस्ते प्रदान केला गेला. महासंघाच्या पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष प्रवीण गायकवाड उपस्थित होते. डॉ. साळुंखे यांनी लिहिलेल्या 'गुलामांचा धर्म आणि गुलाम बनविणाऱ्यांचा धर्म एक नसतो' या पुस्तिकेचे प्रकाशनही या वेळी आहे.

## सांस्कृतिक वातावरणाचा कवींवर प्रभाव : पानतावणे

''कविता हा सांस्कृतिक आविष्कार असून, कवी ज्या सांस्कृतिक वातावरणातून येतात त्या वातावरणाचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर पडत असतो,'' असे मत ज्येष्ठ समीक्षक गंगाधर पानतावणे यांनी मांडले.

'साहित्य कलायात्री' या प्रकाशन संस्थतर्फे 'साहित्ययात्री', 'काव्ययात्री', 'कविवर्य जगदीश खेबुडकर' 'वैजयंतीमाला मदने' व 'इंदुमती लांडगे' या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले, तसेच ६५नवोदित कवी-लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून कवी रामदास फुटाणे व गीतकार जगदीश खेबुडकर उपस्थित होते.

श्री. पानतावणे म्हणाले, ''कोणत्याही साहित्याचे परिष्करण करणे हा दोष आहे, हा भ्रम काढून टाका. परिष्करण ही वाईट गोष्ट नाही. भाष्य हे परिष्करणाचाच एक भाग असतो. 'ज्ञानेश्वर' हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. कविता लिहिणे सोपे तसेच अवघडही आहे. वेदना, दुःख शब्दांत मांडणे अवघड आहे. त्यांच्यातून मानवी जीवनाचे प्रकटीकरण होत असते.''

श्री. फुटाणे म्हणाले, ''मराठी मौखिक परंपरेतून टिकली आहे. पूर्वी ज्यांनी ही मौखिक परंपरा टिकवण्याची गरज होती, तेच आता पुस्तकांपासून दूर जात आहेत. म्हणून साऱ्यांचे लक्ष ग्रामीण भागाकडे वळले आहे.''

तळागाळातल्या वेदना प्रकट व्हायला हव्यात, असे सांगून श्री. खेबुडकर म्हणाले, ''सातत्याने



एखादी गोष्ट करत राहिल्यास समाजात त्यांचा ठसा उमटतो. फक्त संख्या वाढवण्यासाठी कविता न लिहिता खूप वाचन, चिंतन, मनन करून कविता लिहाव्यात.''

## प्रज्ञा बेलखोडे यांच्या कथेस पुरस्कार

पुणे येथील साहित्यप्रेमी भगिनी मंडळातर्फे घेण्यात आलेल्या डॉ. शकुंतला लाटकर पुरस्कृत आनंदीबाई लिमये कथा स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रज्ञा बेलखोडे यांच्या 'एक दिवस कॉपीराईटरचा' या कथेस जाहीर करण्यात आला आहे. द्वितीय डॉ. वैजयंती पटवर्धन यांच्या 'आठ अठ्ठावन्न' कथेस तर तृतीय पुरस्कार स्वाती शहा यांच्या 'पुरस्कार' कथेस जाहीर करण्यात आला. परीक्षक म्हणून डॉ. अनघा केसकर व संध्या रानडे यांनी काम पाहिले.

## साहित्य साधना संस्थेतर्फे काव्यवाचन पुरस्कार

'साहित्य साधना' संस्थेच्या वतीने राज्यस्तरीय 'काव्यवाचन स्पर्धा' व 'निमंत्रितांचे कविसंमेलन' नुकतेच पार पडले.

काव्यवाचन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शिवाजी सावंत यांच्या अध्यक्षतेखाली झाला. व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. काव्यवाचन स्पर्धेत गुरुनाथ गर्दे (सिंधुदुर्ग) यांना प्रथम, तर रघुनाथ पाटील (पुणे) यांना द्वितीय क्रमांक मिळाला. सूर्यकांत जोशी (नाशिक) यांना तृतीय क्रमांक मिळाला. स्पर्धेचे परीक्षक म्हणून स्वाती सामक, ज्योत्स्ना चांदगुडे व प्रभा सोनवणे यांनी काम पाहिले.

## दत्ता टोळ आणि आसावरी काकडे यांना शिरोळे पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे दरवर्षी बालसाहित्यक्षेत्रात गुणवत्तापूर्ण योगदान करणाऱ्या लेखकाला बाबुराव शिरोळे पुरस्कार देण्यात येतो. तो या वर्षी अ. भा. बालकुमारसाहित्य संमेलनसंस्थेचे विश्वस्त दत्ता टोळ यांना देण्यात आला. तसेच आसावरी काकडे यांना लक्ष्मीबाई शिरोळे लेखिका पुरस्कार द. मा. मिरासदार यांच्या हस्ते दि. १४ जुलै रोजी देण्यात आला.

## बाबाराव मुसळेंना आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार

प्रसिद्ध ग्रामीण कथालेखक आणि कादंबरीकार श्री. बाबाराव गंगाराम मुसळे यांना महाराष्ट्र शासनाचा २००२ चा आदर्श शिक्षक राज्य पुरस्कार जाहीर झाला आहे. हा पुरस्कार येत्या ५ सप्टेंबरला शिक्षक दिनी प्रदान करण्यात येणार आहे.

बाबाराव मुसळे ह्यांच्या 'हाल्या हाल्या दुधू दे' आणि 'पखाल' या दोन कादंबऱ्या आणि 'मोहरलेला चंद्र' आणि 'झिंगू लुखू लुखू' हे दोन कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे यांचे तर्फे प्रकाशित झाले आहेत. 'पखाल' या कादंबरीला १९९५ सालचा शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी दिला जाणारा कै. वि. स. खांडेकर पुरस्कार प्राप्त झाला आहे. 'पखाल' ही कादंबरी अमरावती विद्यापीठात एम्. ए. भाग १ साठी अभ्यास-क्रमाला आहे. तसेच त्यांच्या दोन्ही कादंबऱ्यांवर महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विद्यापीठात एम्. फिल/पी. एच. डी.साठी अभ्यास केला जातो.

## पुस्तक परिचय

# संवादिनी

व. पु. काळे




### केवळ संभाषणातून फुलत जाणाऱ्या नाट्यपूर्ण कहाण्या

'संवादिनी' या कथासंग्रहामधील सहाही कथा या संवादात्मक आहेत; आणि तरीही नाट्यपूर्ण अनुभूती देणाऱ्या आहेत. वपुंच्या आशावादी, उत्साही व आनंदवादी दृष्टिकोनाचे दर्शन घडविणाऱ्या आहेत.

'उद्याचा दिवस' मध्ये राजाभाऊ आपल्या एका मित्राला व त्याच्या पत्नीला सांगतात, ''भाई, अष्टमेश मंगळ बाराव्या घरातून जातोय; तुम्हाला जपायला हवं.'' राजाभाऊ हे पत्रिकेपेक्षा संख्याशास्त्रावर भर देतात. ते ताईला एक अंक मनात धरायला सांगतात. ती सदतीस अंक सांगते. तेव्हा राजाभाऊ इशारा देतात, ''भाई, तुम्ही स्वत:ला वाहनापासून जपायचं.'' भाई विचारतो, ''हे मोघम बोलणं झालं. वाहन कुठलं? किती चाकाचं?'' तेव्हा राजाभाऊ पुन्हा एक अंक धरायला सांगतात. त्यावर राजाभाऊ म्हणतात, ''चार चाकी वाहन. पुढचे पंधरा दिवस जपायला हवे.'' या पंधरा दिवसात भाईच्या लांबच्या बहिणीची, सुमनची डिलिव्हरीची तारीख येत असते. पंधरा वर्षानंतर ती प्रथमच गरोदर असते... धास्तावलेला भाई पंधरा दिवसांची चक्क रजा काढतो. तिसऱ्या मजल्यावरच्या फ्लॅटमध्येच राहतो... तेव्हा राजाभाऊंनाच वाटतं की आपण उगाचच यांना भविष्य सांगितलं. ते ताईला म्हणतात, ''मी भविष्य सांगितलं ही एक मोठी चूक केली.'' पण पत्रिका न बघताही मला माणूस कळतो असे म्हणणारी ताई तरीही विचारते, ''भाईंना खरोखरच तशी काही भीती नाही ना? राजाभाऊ, कितीही चमत्कार घडला तरी रस्त्यावरची मोटार फार तर फूटपाथवर चढेल; पण तिसऱ्या मजल्यावरच्या खोलीत घुसणार नाही.

..आणि पंधराव्या दिवशी, घरातून बाहेर न पडताही, भाईंचा डावा हात संपूर्ण प्लॅस्टरमध्ये असतो.

हे कसे घडले ?... ते येथे सांगण्यात मतलब नाही. पण राजाभाऊंना भाई फैलावर घेतो, ''तुझं संख्याशास्त्र एकदम बोगस आहे. मला धोका रस्त्यावर, म्हणजे घराबाहेर नव्हताच. मी घरातच पडलो.'' .... तुझं ते संख्याशास्त्र आणि त्यावर मी विकत आणलेली ती पाच पुस्तकं माझ्यासमोर जाळून टाक.'' राजाभाऊ मग ताईशी बोलतात. ताई त्यांना सांगतात, ''ये बाबा, आलास. तुझी वाटच पाहत होते.. तू सांगितलंस तसंच घडलं... त्यांना अजून ते माहित नाही... त्यांना कळलं तर ते संख्याशास्त्रावरची आणखीन ४०/५० पुस्तकं घरात आणून टाकतील.''



### पुस्तकाची खास वैशिष्टये...

**केवळ संवादातून फुलत जाणाऱ्या तरीही नाट्यपूर्ण अनुभूती देणाऱ्या रंगतदार कथा.**
**मानवी स्वभावातील संगती-विसंगतींचे मार्मिक अवलोकन आणि असीम करुणा बुद्धीने केलेले चित्रण.**
**नोकरी करणाऱ्या स्त्रियांच्या मानसिकतेचा वेध पति-पत्नी नात्यातील सुप्त ताणतणाव आणि उदार सामंजस्य यांची आकर्षक पेशकश.**

वाचकमित्रहो, आता या ताई-राजाभाऊंच्या संभाषणावरून काय लक्षात येते, त्याचा तुम्हीच मागोवा घ्या. राजाभाऊंचे भविष्य तर खरे ठरलंय, आणि भाई आपल्या तिसऱ्या मजल्यावरच्या फ्लॅटमधून पंधरा दिवसात एकदाही बाहेर पडले नाहीत हेही खरे! अपघात वाहनाने, तोही चार चाकी वाहनाने झाला हेही खरे!...

वपुंचे कौशल्य या अशा नाट्यपूर्ण घटनांची उत्कंठापूर्ण रंगत वाढवण्यात दिसते. राजाभाऊंशी होणाऱ्या या जोडप्याच्या गप्पांची लज्जत तर चाखता तर येतेच, त्यापेक्षाही जास्त गंमत ताई-भाई यांच्यातील जुगलबंदीने येते.

*''माझ्याकडे का पाहताय?''*

*''मग कुणाकडं पाहायचं? तू माझी बायको. मला जपायला हवं ही सूचना राजाभाऊंनी तुला तुला दिली आहे. बघा, राजाभाऊ, कसं हसण्यावारी नेते, पाहा.''*

*''अहो पण...''*

*''आता काही सांगू नकोस. पाहिलंत राजाभाऊ? घरातल्या माणसांनी जर गंभीर गोष्टीची अशी चेष्टा चालवली तर आमचं रक्षण आम्हीच करायला हवं की नको?''*

*''तुम्ही अगदी कमाल करतांय हं. जपायला हवं असं हे म्हणतात. पण त्यांना आधी विचारा की कशापासून जपायचं? किती दिवस? कशा तऱ्हेने? हे सगळं विचाराल की नाही?''*

*''तू जर ह्याच तऱ्हेने बोलणार असशील तर मला तुझ्यापासून आधी जपलं पाहिजे.''*

*''उत्तम. मला परवानगी द्या. की मी चालले.''*

*''कुठं?''*

*''अर्थात माहेरी.''*

*''हे पाहा राजाभाऊ. माझ्या जिवाला अपाय आहे असं तुम्ही सांगताय आणि ही निघाली माहेरी, बघून ठेवा.''*

*''अहो पण भाई...''*

*"मी कसा संसार केला असेन हे जाणून घ्या. ह्यांना बायकोची मुळीच गरज नाही..."*

'निरंजन, मला उत्तर हवंय' या 'संवादिनी'मधील पहिले दृश्य माथेरानचे आहे. पेडर रोडवर राहणारे जोडपे श्रीधर व माधुरी माथेरानच्या शांत वातावरणात एकमेकांच्या सहवासात रममाण झालेले आहे. "श्रीधर, चेष्टा नाही. खरंच, मी फार सुखी आहे ह्या क्षणी. अगदी तृप्त आहे." असे ती म्हणते आणि श्रीधरच्या चेहऱ्यावर असे तिला काही दिसते की, "तुमचा चेहराच सांगतोय, काही लपवायचं नाही माझ्यापासून" असे तिला म्हणावे लागते. आणि नंतर विषय निघतो तो मुलाचा, "मला मूल हवंय. पण ते तुमच्याकडून हवंय." "मला नकोय का तसं?" पण तसं ते होणार नाही म्हणून... टेस्ट ट्युबचा मार्ग." "श्रीधर, प्लीज वेट, आय कान्ट बेअर इट. इट्स व्हेरी क्रुड. सगळी विटंबना वाटते..."

या पुढच्या दृश्यात माधुरी दिसते ती निरंजन या नटाबरोबर बोलताना. लग्नाआधी आठदहा वर्षे माधुरीने नाट्यक्षेत्रात काढलेली असतात. निरंजनबरोबर भामिनीची भूमिका केलेली असते. परंतु लग्नानंतर नाट्यक्षेत्राकडे तिने पाठ फिरवलेली असते. आता नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी माधुरीची आणि निरंजनची गाठ पडते. पूर्वीच्या आठवणींना उजाळा मिळतो. आणि ती त्याच्याशी एकान्त साधते; आणि नंतर त्याला सांगते, "आपल्या मिलनाची खूण या क्षणी माझ्या पोटात वाढत आहे." निरंजन चक्रावतो. 'श्रीधरचं काय?' असा प्रश्न करतो. ती त्याला समजावून सांगते, "श्रीधर मला मूल देऊ शकत नाही. म्हणून आम्ही दोघांनी टेस्ट ट्युब बेबीचा प्रयोग करायचा निर्णय घेतला आहे. डॉक्टरांशी अपॉइंटमेंटही घेतली आहे... श्रीधर दौऱ्यावरून परत आल्यावर डॉक्टरांकडे जायचे आहे." त्याचवेळी ती हेही स्पष्ट करते की डॉक्टरांना विश्वासात घेऊन टेस्टट्युब बेबीचं नाटक करायचं..."

—"माझा रंगमंच जरा मोठा आहे. त्यात अंक नाहीत. प्रवेश नाहीत. प्रॉम्प्टर नाही. पडदा पडणार तो एकदाच. नंतर मिळणाऱ्या टाळ्याही मालकीच्या नाहीत." - हे खास वपु शैलीतले वाक्यही ती उच्चारते.

"ही श्रीधरची फसवणूक नाही का ? असेलही. पण अनभिज्ञतेच्या दुःखापेक्षा ह्यातली वेदना सौम्य आहे.... काही काही व्यथा पत्कराव्या लागतात. सांभाळाव्या लागतात. ह्या माझ्या कृतीनं श्रीधरपेक्षा जास्त ताण मलाच सहन करावा लागणार आहे...." अशी तिची या क्षणीची भावना आहे.

आता पुढची कलाटणी वपु कशी देतात या कहाणीला?

दहा वर्षांनी निरंजनचा फोन येतो.. "माझी नाटक कंपनी बंद पडली. मी मरता मरता वाचलो. आता एकटा राहतो. बायको माहेरी राहते. नोकरी करून मुलांचे पोट भरते...."

तो माधुरीकडे कर्ज फेडण्यासाठी चाळीस हजार रुपयांची मागणी करतो. ती नाही म्हणते तेव्हा तो 'दहा वर्षांपूर्वीचा हिशेब सव्याज वसूल करायची' भाषा, ब्लॅकमेलची भाषा करतो. ती त्याला सांगते. "आज पाच हजार दिले की काही दिवसांनी तू पुन्हा मागणी करशील. एवढं करूनही त्या रकमेशी तू प्रामाणिक राहशील असं नाही. अगोदर पैसा घालवायचा आणि शेवटी संसार घालवायचा. त्यापेक्षा पैसा वाचवते. कायम डोक्यावर तलवार नको. तू ये. श्रीधरना जरूर भेट."

श्रीधरला निरंजन भेटून हे सर्व सांगतो; तेव्हा श्रीधरची प्रतिक्रिया त्याला अनपेक्षित अशी होते.

"एनी हाऊ,तुम्ही मला विलक्षण ताणातून मुक्त केलंत...एका कलावंताचं रोप माझ्यासारख्या रसिकाच्या घरी वाढतंय याचा मला आनंद वाटतोय... हा पोरगा कोणाचा हे जर समजलं नसतं तर कदाचित त्याचं व्यक्तिमत्त्व फुलवण्याच्या कामात मला अपयश आलं असतं. आता तसं व्हायचं नाही..."



ब्लॅकमेल करायला आलेल्या निरंजनला श्रीधर सांगतो, "तुम्हाला काय हवंय ते आता ठरवा.. पैसे हवे असतील तर आकडा सांगा... बाप म्हणून बापाला जी भूक असते ती मी किंवा मधु पुरी करू शकणार नाही. तुम्हाला बाप म्हणून मुलाकडून जे हवं असेल ते फक्त मुलगा आनंद हाच देऊ शकेल... तेव्हा तुमची मागणी सांगा..."

मानवी स्वभावाचे असे अनोळखी, अपरिचित कप्पे दाखवण्याची वपुंना विलक्षण हौस होती. त्यांची माणसे रूढ चाकोरीतून जात नाहीत; ती काहीतरी वेगळ्या पण स्वतःच्या स्वभावाशी सुसंगत अशी वागतात. अधिक जिवंत वाटतात. खरी माणसे वाटतात. नाही ती अपराधभावना मनाशी जपत आपले आयुष्य नासवायला तयार नसतात. वस्तुस्थितीचा स्वीकार करायची वेळी आली की डगमगत नाहीत; अहंकाराचा वा प्रतिष्ठेचा संभावित बुरखा झुगारून देताना कचरत नाहीत.

कथानकातले वेगवेगळे टप्पे हे अत्यंत कौशल्याने समोर येत राहावेत अशी कमालीची दक्षता वपु घेतात. कौशल्य सारे रचनेत आहे हे त्यांना ठाऊक आहे. त्यामुळे साधे साधे किस्सेही ते रंगतदार बनवून पेश करतात. त्यांची पेशकश ही त्यांच्या कथाकथनतंत्राच्या सगळ्या क्लृप्त्या चपखलपणे वापरणारी असते.

पती आणि पत्नी घरी निवान्त एकान्ती असताना मिठीत येऊ पाहतात; पण त्यावेळी पप्पूनं आपल्याला बघितलं का अशी शंका पतीला येत राहते; आणि त्या धावत्या भेटीची मजा हरवते. पप्पूनं आपल्याला ओझरतं तरी पाहिलं असावं या शंकेची खातरजमा करून घेण्यासाठी पप्पूला सूचक प्रश्न विचारण्यात येतात. मिठी वगैरे प्रकार मुलांना कळू नयेत ही जबरदस्त नैतिक जाणीव.... पण तिच्या पार ठिकऱ्या होतात. कशा ? पप्पू एका बालचित्रपटाला जातो. नऊ वर्षाच्या मुलीची एक बाहुली हरवते. ती खूप शोधते. शेवटी बाहुली सापडते; आणि ती मुलगी बाहुलीला मिठी मारून तिचे मुके घेत सुटते.... जागरुक नीतिवादी पालकांची अशी दैना होते; आणि वपुंना ती मिस्किलपणे सांगण्यातही थ्रिल वाटते.

आफिसमध्ये अत्यंत सचोटीने, सिन्सिअरली काम करण्याऱ्या 'गृहिणी'ला -इंद्रायणीला रजा काढून घरी राहिल्यावर काय करायचं तेच कळत नाही. वेळ जात नाही. मुलांनाही तिचं घरी राहणं चमत्कारिक वाटतं. नेहमी फिरतीवर असणारा तिचा नवराही तक्रार करतो, "ती रजेवर आहे. तिनं आता फुलायला हवं. पण नाहीच रे. आमचे एवढ्यातेवढ्यावरून क्लॅशेस उडत आहेत. मुलांशी क्लॅशेस. घरगड्याशी क्लॅशेस." रजा नकोशी होते मग !

— आणि नोकरी करणाऱ्या बायकांच्या सायकॉलॉजीकडे वपु लक्ष वेधतात.

नोकरी करणाऱ्या बायका घरापेक्षा ऑफिसात जास्त प्रसन्न असतात. ऑफिसचं काम अंशमात्र त्यांच्यावाचून खोळंबून राहतं. चार आजूबाजूची माणसं दहा वेळी चौकशी करतात. नवऱ्यापेक्षा ऑफिसातला सहकारी जवळचा वाटतो. आपण आपल्या बायकोचं कधीच ऐकू शकणार नाही. ऑफिसातला तिचा मित्र सगळं ऐकतो. कारण तिच्या संसारातल्या दुःखाला तो मित्र मुळीच जबाबदार नसतो. कोणताही स्वार्थ नसतो तेव्हाच माणूस शांतपणे इतरांच्या समस्या ऐकतो. इतक्या कळत नकळतपणे बायको दुरावते. इट इज सॉर्ट ऑफ स्लो पॉयझनिंग." (२१)

**पुरुषांना स्वयंपाक येऊ नये आणि बाईला नोकरी करता येऊ नये. एकमेकांच्या कर्तृत्वाचे प्रांत अनभिज्ञच हवेत. तरच एकमेकांच्या कर्तबगारीचं कौतुक टिकतं. 'त्यात काय आहे, मी पण करीन' - इथं समर्पणभाव संपला. स्पर्धा आली. कौतुक संपलं. तुलना आली. साथ संपली, स्वत्वाची जाणीव आली. (२२)**

*“शिक्षण घेतलेल्या बायका. प्रकाशासारख्या पसरल्या. जिथं तिथं बायका. ह्यांना आता पुन्हा घरांकडे कशा वळवायच्या हे तुला मला सांगताच येणार नाही. क्वचित पुढची पिढी सांगू शकेल. तेही ह्या पिढीला गरज पडली तर.”*

दोन पैजांची गमतीदार कहाणीही वपु खुलवून सांगतात. “रमेश, ही मोहिनी साठे. आमच्या ऑफिसातच काम करते. आज सिनेमाला आम्ही दोघे परस्पर चाललोय. कृपया संजीवनीला निरोप पोचवशील? नाहीतर ती काळजी करील.” संजीवनी ही रमेशची बहीण. मिस्टर देवधरांची पत्नी.

संजीवनी, माझी बहीण-तापट स्वभाव... पण हा निरोप ऐकूनही शांतच राहते. कारण? तिने शांत राहण्याची पैज मारलेली असते. शंभर रुपयांची... संजीवनी जिंकते आणि देवधर ? देवधरही ऐंशी रुपयांची पैज हरतात. त्यांची ऑफिसात पैज मारलेली असते. बायको भांडेल म्हणून, पण ती भांडतच नाही.

— वपुंच्या या सारख्या मिस्किल कथा वाचताना मोपासांचे स्मरण होते. शेवटी कलाटणी देण्यात व मानवी मनाचे गुंते दाखवण्यात मोपासांही कुशल होता. वपुंच्या कथांची म्हणून इंग्रजी फ्रेंचमध्ये भाषांतरे व्हायला हवीत.

**पृष्ठे : ९२ किंमत : ७०रु. सभासदांना :५३रु. पोस्टेज :२०रु.**





**टी बुक क्लब १० मधील शेवटचे पुस्तक**

**टू कट् अ लाँग स्टोरी शॉर्ट**

**मूळ लेखक**
**जेफ्री आर्चर**
**अनुवाद**
**लीना सोहोनी**

**जेफ्री आर्चर यांच्या खास शैलीतील विस्मयकारक कथा.**

**किंमत : १८०रु.**

**क्लबचे सभासद व्हा आणि क्लबची पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!**

**टी बुक क्लब १० मधील उपलब्ध पाच पुस्तकं**

**फिअर इज द की**
मूळ लेखक : ॲलिस्टर मॅक्लीन
अनुवाद : अशोक पाध्ये
किंमत : १६०रु.

**द सिस्टरहुड**
मूळ लेखक : कॉलिन फोर्बस्
अनुवाद : अंजनी नरवणे
किंमत : २५०रु.

**कन्टेजन**
मूळ लेखक : डॉ. रॉबिन कुक
अनुवाद : प्रमोद जोगळेकर
किंमत : २४०रु.

**द लॉस्ट वर्ल्ड**
मायकेल क्रायटन अनु : प्रमोद जोगळेकर
किंमत : २२०रु.

**३००१ द फायनल ओडिसी**
आर्थर सी. क्लार्क अनु : प्रमोद जोगळेकर
किंमत : १६०रु.

सभासद फी ५० रु.
सहा पुस्तकांसाठी पोस्टेज ३५रु.




**मध्यमवर्गीय जीवनातील समस्यांचे वैशिष्ट्यपूर्ण आकलन**

## स्वर

**व. पु. काळे**




लोकप्रिय कथाकार वपु काळे अतिशय सहजतेनं चपखल उदाहरणांद्वारे आयुष्यातील गुंतागुंत सोपी करण्याचा नेमका धागा वाचकांच्या हाती सोपवतात. त्यांच्या प्रत्येक कथेत चिंतनाचे सूर उमटत राहतात आणि त्या चिंतनाच्या सुरांनी अर्थांची वेगवेगळी वलये मनात फेर धरू लागतात. मुळात अत्यंत खुमासदार घटना; चमत्कृतिपूर्ण प्रसंग व व्यक्ती; आणि त्यांच्या अनपेक्षित वर्तनामुळे उडणारा गोंधळ... पण तो वपु आपल्या खास कथाकथनतंत्रशैलीने कमालीचा उत्कंठापूर्ण बनवतात. त्यामुळे त्यांच्या कथेचा शेवट एकतर ध्यानीमनी नसलेली कलाटणी देऊन होतो किंवा आसमंत लख्खकन चकाकून सोडणारे जीवनविषयक तत्त्वज्ञान किंवा सत्य सांगून होतो. जीवनविषयक प्रसन्न, आशावादी व उदार जाणीव ही त्यांच्या प्रत्येक कथेला एक वेगळीच उंची देऊन जाते.

‘स्वर’ या कथासंग्रहाच्या शेवटच्या पृष्ठावर हा आशय व्यक्त करणारा ‘ब्लर्ब’ दिला आहे; तो यथोचितच आहे. वपुंच्या कथचे मर्म प्रकट करणारा आहे.

‘स्वर’ मध्ये एकूण पंधरा कथा आहेत. ठुमरी, सोळा जानेवारी, स्वर, सत्कार, धर्म, किक्, पराभव, जिद्द, दुर्वास, भाऊचा धक्का, पहिली खेप, वसावसाचा वसा, मोले घातले बोलाया, मला समजतंय, आणि ‘मी, माझी सौ व तिचा प्रियकर’, ठुमरी ही गोष्ट वीस पृष्ठांची आहे. बाकीच्या सहा ते पंधरा पृष्ठांच्या.

आपल्या पतीनं आपली एकेकाळची प्रेयसी अचानक भेटल्याचे सांगितल्यावर जयश्रीमधला संशय चवताळून उठतो. स्वप्नात कोणीतरी देवी येते आणि तिला सांगते, “तुझ्या नवऱ्याला सांभाळ.” एका सिनेमाला जयश्री जाते, त्या चित्रपटाची कथा तिला आवडते. लग्नापूर्वीचे प्रियकर-प्रेयसी एकमेकांना भेटतात आणि दोघांच्यात काहीही न घडता ते एक रात्र एकत्र काढतात. फक्त गप्पा मारतात. जयश्री ही कथा रंगवून शेजाऱ्यांना सांगते आणि म्हणते, “पण हे असे आदर्श पुरुष सिनेमातच सापडणार. प्रत्यक्षात एवढा संयम पाळू शकणारा माणूस अशक्य. आलेली संधी पुरुष सोडतो काय कधी ? नाटक, सिनेमा, कथा-कादंबरीत ठीक आहे हे सगळं–”

तेव्हा निवेदकाला सांगावंसं वाटतं की, “मूर्ख स्त्रिये, अगं, असा एक मर्यादा पुरुषोत्तम ह्या क्षणी तुझ्या या उंबऱ्यात उभा आहे.”

## पुस्तकाची खास वैशिष्टे...

- वपु काळे यांच्या कथाकथन शैलीचा विलोभनीय आविष्कार करणाऱ्या वेगवेगळ्या पार्श्वभूमीवरच्या कथा.
- जे काही आपल्याला लाभले आहे, त्याचा स्वीकार करून जीवन आनंदमय करावे हे वपुंचे तत्त्वज्ञान.
- अकल्पित कलाटणी देऊन वाचकांना चकित करण्याची वपुंची हातोटी.
- अस्तित्त्वाला भक्कम आधार देणारे नैतिक भान.

ठुमरी हे नाव या कथेला दिलेय; ते का?

अनुराधा सुनीलला सांगते, ''संसार हा धीरगंभीर उदात्त रागदारीसारखा असतो. तास तास चालणारा. ठाम, विलंबित, द्रुत अशा अंगानं फुलणारा. केव्हा केव्हा फार संथ वाटणारा. उदास करणारा. कंटाळा आणणारा आणि मध्येच तुझ्यासारख्या मित्राची आठवण, हा मोठा राग आळवून झाल्यानंतरच्या ठुमरीसारखी असते. दहा मिनिटात संपणारी पण सगळी मैफल गुंगत ठेवणारी. मरगळ घालवणारी.''

रजेवर जाण्यापूर्वी लीला फडणीस प्रत्येक सहकाऱ्याला एकेकट्याला गाठून कॉन्फिडेन्शियली सांगते, ''डॉक्टरांनी सोळा तारीख दिली आहे. कुणाला सांगू नका.'' प्रत्येकाला मनातून वाटते, ''ही कॉन्फिडेन्शियल बातमी फक्त आपल्यालाच ठाऊक आहे... लीला फडणीसने ही खास बातमी फक्त आपल्यालाच सांगितलीय या जाणिवेने प्रत्येकजण मोहरतो. परिणाम ? सोळा तारखेला ऑफिसात कोणीच येत नाही. प्रत्येकाची रजेची चिठ्ठी... एकटे बॉस येतात. तेही मॅटर्निटी होमचा नंबर फिरवतात...

यासारखा किस्साही वपु काळे मोठा खुलवून पेश करतात.

हेच वपुंचे मानसशास्त्राचे ज्ञान 'सत्कार' कथेतही आपल्याला दिसते.

आपला एकसष्टीचा गौरवांक निघावा ही एकेकाळी नाट्यचित्रपटसाहित्यक्षेत्रात काही काळ कार्य करणाऱ्या केशवरावांची इच्छा. ते स्वत: आजारपणामुळे अंथरुणाला खिळलेले. म्हणून साठीबाबत संबंधित व्यक्तींना स्मरण देण्यासाठी ते त्यांना भेटायचे पत्नी सरस्वीबाई हिला सुचवतात. पण संबंधित व्यक्ती फारसा प्रतिसाद देत नाहीत. साठीच्या दिवशी नेमका केशवरावांना भेटून डॉ. साठे हार घालतात. त्याच आनंदाच्या भरात केशवरावांना ॲटॅक येतो आणि ते पलंगावर कोसळतात. डॉक्टर इंजेक्शन देतात तेव्हा केशवराव शुद्धीवर येतात. डॉ. साठे सरस्वतीबाईंना सांगतात, ''आज त्यांना कुणालाही भेटू देऊ नका. कुणी हार आणले तर तुम्ही ते घेऊन त्यांना नेऊन द्या. पण भेटायला देऊ नका.'' सरस्वतीबाई दर तासाने एकेक हार घेऊन केशवरावांना देत



हा अमक्याचा, हा तमक्याचा असे सांगत राहतात आणि केशवरावांच्या मनाला उभारी आणत राहतात. ''हा लपंडाव. लोकांनी मला फसवायचं. मी लोकांना फसवायचं. कृतघ्न सहकाऱ्यांच्या उपेक्षेचा धक्का पतीला या अवस्थेत जाणवू नये'' म्हणून सरस्वतीबाईनी चालवलेली ही कसरत म्हणजे एक मानसशास्त्रीय उपचारच !

टेलिफोन ऑपरेटरच्या जागेसाठी इंटरव्ह्यूचा कॉल आलेली पुष्पा शाळिग्राम फोनवरून आपणास उशीर होईल असे सांगते, तेव्हा तिच्या आवाजातला गोडवा व मार्दव जाणवून कथानिवेदक तिचीच नेमणूक करायचे मनोमन नक्की करतो. तंबोऱ्याच्या तारांना जवारी लावल्यावर ज्याप्रमाणे स्वर काही काळ घुमत राहतो, त्याची आस मनी राहते तसा काहीसा तिचा आवाज - तो त्याला जिंकतो. प्रत्यक्षात ती येते, तेव्हा तिचा काळा रंग व सामान्य रूप पाहून त्याला प्रश्न पडतो, ''परमेश्वरानं या मुलीला काहीही न देण्याएवढं कफल्लक का असावं ?'' तरीही त्या आवाजामुळं तिला नोकरी दिली जाते. बॉसला ती नंतर एकदा आपल्यावर असलेल्या कर्जाची कल्पना देताना म्हणते, ''माझ्यासारखी मुलगी ज्या आईवडिलांना असते, त्यांना ती मुलगी म्हणजे कर्जच नाही का?... कातडीचा रंग काळा. त्याचे हजार रुपये मी धरले. केस आखूड. त्याचे पाचशे रुपये. डोळेही पाणीदार नाहीत. त्याचे पाचशे. ओठ जाड. त्याचे हजार. बांधा- त्याचे दोन तीन हजार. लग्नाच्या वेळी फक्त पैसाच धावून येईल. एखादा अडलेला वरपिता देईल त्याच्या गृहलक्ष्मीची जागा मला.''

आपल्याच ऑफिसमधल्या अच्युतबरोबर ती दोन तीन महिने फिरताना दिसल्याचे बॉसला कळते. तेव्हा त्याला आश्चर्य वाटते. खरे तर अच्युतचे लग्न ठरलेले असते; त्याची भावी पत्नी परगावी गेलेली असते, हे सर्वांना ठाऊक असते. बॉसच्या प्रश्नाला उत्तर देताना पुष्पा आपली भूमिका प्रकट करते, ''मी निव्वळ स्वत:च्या आनंदासाठी अच्युतबरोबर फिरते. मला थोडा कैफ हवा होता. धुंदी हवी होती. पुरुष बाईसाठी कसा वेडापिसा होतो हे मला लांबून पाहायचं होतं. माझ्या लग्नानंतर मला तसा कैफ अनुभवायला मिळेलच ह्याची खात्री नव्हती... एकदा पुरुषाच्या वासनेने उसळी खल्ली की त्याला फक्त स्त्री हवी असते. मग ती कशी का असेना !... मला माझ्या या कुरूपतेनंच वरदान दिलंय असं म्हणायला हवं. माझ्यासारख्या कुरूप मुलीबरोबर अच्युतसारख्या राजबिंड्या गृहस्थाचं काही गणित असेल अशी शंकाही घेण्याचं धाडस कुणाला झालं नाही.. जसं एखादीचं सौंदर्य अपूर्व असतं तशी माझी कुरूपताही अपूर्व आहे.''

'स्वर' या कथेच्या माध्यमातून वपुंनी रूपहीन कुमारी तरुणीच्या व्यथांची एक वेगळीच कैफियत सादर केली आहे. पुष्पाला घेऊन अच्युत आपल्या भावी सासुरवाडीलाही भेट देतो; तरी कोणाला काही वाटत नाही. यासारखे तपशील म्हणजे वपुंचे मास्टर स्ट्रोकच !

'आटपाट नगर होतं. तिथं एक ब्राम्हण होता' अशा कहाणीच्या ढंगात 'वसावसाचा वसा' ही कथा वपु सांगतात. कथेतल्या ब्राम्हण अविरत पत्नीधर्माचा वसा घेतो, त्यामुळे त्याला वडिलांनी दिलेला शाप बाधत नाही. बायको वसावसा ओरडत नाही. ''हे व्रत कायम करायचं असतं, हे व्रत शंकरानं पार्वतीला, पार्वतीनं गणेशाला, गणेशानं नारदाला आणि नारदांनी अनेकांना सांगितलं'' असाही परंपरेचा हवाला वपु देतात.

बंद पडलेली स्कूटर मेकॅनिक दोन मिनिटातच ठीक करतो आणि ती वाघिणीसारखी गुरगुरू लागते. त्या मेकॅनिकनं स्कूटरचीच कळ फिरवली नाही, आपलीही फिरवली असं निवेदकाला वाटतं, आणि घरातल्या मुलाच्या समस्येकडे नव्या दृष्टीने तो बघायला सिद्ध होतो. (किक्)

एका साहित्यिकाकडे रविवारी लेखककवींची मैफल जमते. हॉटेलमधून खाद्यपदार्थ येतात. लेखककवी खूष होतात. अनेक रविवार असे जातात... हे खाद्यपदार्थ कोण पाठवते ?... वपु आपल्या चाहत्या रसिकाचे कौतुक 'पराभव' या कथेद्वारे करण्याची संधी देतात.

वपु काळे यांच्या या कथांमधून मध्यमवर्गीय जीवनातील अनेकविध सामाजिक-नैतिक-कौटुंबिक समस्यांचेही एक वेगळे रूप समोर येते. या अस्तित्वाला भक्कम मानसिक आधार शोधण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. जगण्यासाठी विशिष्ट मूल्यभानाची गरज असते. आयुष्याची इमारत भक्कम पायावर उभी करावी लागते. भावभावनांच्या पायावर ती सदैव हादरत राहते; तिला भक्कमपणा आणण्यासाठी, एका नैतिक भानाची गरज असते. त्या नैतिक भानाचे विविध पैलू प्रकट करणे हे एक कथाकार म्हणून वपु काळे आपले उत्तरदायित्व मानत राहिले. 'स्वर'मधील कथा त्याची साक्ष देतात.

**पृष्ठे : १४८ किंमत : १००रु. सभासदांना :७५रु. पोस्टेज :२०रु.**

## स्पर्धा निकाल

**एप्रिल २००२**

**अनुवादित पुस्तकांची नावे**

आय डेअर : किरण बेदी, सिलेक्टिव्ह मेमरी, कारगिलनामा, ख्यातनाम इतिहासकार, बिझिनेस महाराजे, कैलासवासी मुंबई, फिअर इज द की, ब्लास्फेमी, पर्व, चौघीजणी, विद्रोही, अणसार, द्वंद्व, पूजाघर, द सिस्टरहुड, मंदिरा, कोमा, हितगुज, डॉ. झिवागो

**यशस्वी स्पर्धक**

१. **आनंद ठाकूर देसाई** - २१ बी १२, इंडियन एअरलाईन्स कॉलनी, सांताक्रुझ, मुंबई ९.
२. **मधुसूदन सराफ** - सी-१/५६/६, श्रीरंग सोसायटी, ठाणे १.

**मे २००२ गाळलेल्या जागा भरा व जोड्या जुळवा**

| | |
|---|---|
| १. सांगावेसे वाटले म्हणून | शांता शेळके |
| २. बिझिनेस महाराजे | अशोक जैन |
| ३. तीन दगडाची चूल | विमल मोरे |
| ४. फिअर इज द की | अशोक पाध्ये |
| ५. उद्याच्या सुंदर दिवसांसाठी | नागनाथ कोत्तापल्ले |

**यशस्वी स्पर्धक**

१. **अनिल मानकर** - वार्ड नं. ३, राजनगर, नांदुरा, जि. बुलडाणा ४.
२. **श्रीमती आशा जळगावकर** - वेत्रेंद्र अरोरा, १६७ एफ. एच. वियजनगर, इंदोर.
३. **उर्मिला इनामदार** - ३/१६, उषा, स्वप्न सोसा. सातबंगला, अंधेरी, मुंबई ६१.

**यशस्वी स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन !**


आपण आपल्या पसंतीची शंभर रुपयांची पुस्तके कळवावीत.

आमचा पत्ता : **मेहता मराठी ग्रंथजगत**
द्वारा, मेहता पब्लिशिंग हाऊस, १२१६ सदाशिव पेठ, पुणे ३०.



## इन्टिमेट

**व. पु. काळे**




### तऱ्हेवाईक माणसांच्या अंत:करणातले निर्व्याज प्रांजलपण

'इन्टिमेट' या कथासंग्रहात फ्रॉम कमिशनर्स डेस्क, जावडेकर बोला, केव्हाही बोलवा, ड्रीम सिक्वेन्स, बिरबलाची आणीबाणी, प्रोव्हिजन, मोदी अँड मोदी, जे फॉर, आणि इन्टिमेट अशा नऊ कथा आहेत.

वपु काळे यांच्या कथेतील माणसे चारचौघांसारखी सामान्य संसारीच असतात; पण ती काही बाबतीत चमत्कारिक किंवा तऱ्हेवाईकही वागणारी असतात. मात्र त्या तऱ्हेवाईपणामागे त्यांचे स्वत:चे असे खास तर्कशास्त्र असते; आणि वाचकांनाही ते पटण्यासारखे असते. कारण त्या त्या पात्रांच्या मानसिकतेचा उलगडा त्यामुळे होतो; त्या वर्तनामागचे मानसशास्त्रीय स्पष्टीकरण वा रहस्य त्यातून प्रकट होते. अशा रहस्याचा भेद करणे हे वपुंच्या कथाकथनाचे विलोभनीय बलस्थान असते. किंबहुना असे काहीतरी मानसशास्त्रीय व वर्तनशास्त्रीय वेगळेपण वाचक-श्रोत्यांच्या मन:पटलावर बिंबवण्यासाठीच वपु आपल्या कथा-कादंबऱ्यांचे डोलारे उभे करीत असतात.

'इन्टिमेट' या संग्रहातील कथांमध्ये अशी तऱ्हेवाईक वागणारी अनेक पात्रे भेटतात.

शेजारी म्हणून नव्यानेच रहायला आलेल्या विचारे यांना पहिल्याच दिवशी पहाटे कथानिवेदक म्हणतो, ''आज प्रथम माझे तोंड पाहत आहात. दिवस कसा गेला ते रात्री कळवा.'' आणि रात्री बारा वाजता विचारे या 'मी'ला गाढ झोपेतून उठवतात आणि मूठभर पेढे देतात; वर रोज पहाटे मला तुमचे दर्शन द्याल का असे विचारतात, कारण त्यांना तो दिवसा फारच शुभ गेलेला असतो. ''रात्री असं रोज रोज उठवणार नसलात तर पहाटे दर्शन देईन असे 'मी' म्हणतो. आणि पुढे नऊ वर्षे रोज पहाटे हा शेजाऱ्याला दर्शन देण्याचा परिपाठ अविरत चालतो. (इन्टिमेट). हा मी म्हणजे कथानिवेदक 'काळे', म्हणजे कथाकथनकार वपु हेही कथेत स्पष्ट सांगण्यात येते.

हे विचारे एके दिवशी आत्महत्या करतात. त्यांच्या मागे त्यांचे पत्र सापडते : *''मी राजीखुशीनं आत्महत्या करीत आहे... गेले महिनाभर हा विचार मनात होताच. सौभाग्यवतीला मुद्दाम माहेरी पाठवलं आहे. माझ्या बाबतीत कोणतीही माझी माहिती माझे इन्टिमेट स्नेही काळे यांनी विचारावी.''*

या पत्रातील 'इन्टिमेट' हा शब्द काळे यांना छळत राहतो. विचारे यांनीच त्याबद्दल म्हटले

## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

**चारचौघांसारखीच वपुंची माणसे असतात, पण काही बाबतीत ती तऱ्हेवाईक आणि विचित्र वागतात. त्यांच्या तऱ्हेवाईकपणामागेही विशिष्ट तर्कशास्त्र असल्याचे वपुंना सतत जाणवते.**

**अशा तऱ्हेवाईक वागण्यामागची मानसिकता उलगडून दाखवणाऱ्या मानसशास्त्रीय प्रमेयांची बहारदार पेशकथा.**

**विशिष्ट वर्तनविशेषांमुळे लक्षात राहणाऱ्या व्यक्तिरेखा.**

होते, ''मराठी भाषा रांगडी आणि कर्कश आहे. जीवश्च कंठश्च अशी ओळख करून देताना काहीतरीच वाटतं म्हणून साहेबाचा शब्द - इन्टिमेट - हा पळवावा.''

मग वपुंना हा शब्द आता का छळतो? कारण खरोखर नऊ वर्षे शेजारी राहूनही आणि रोज पहाटे दर्शन सोहळा होऊनही आपल्याला विचारे यांच्याबद्दल फारशी माहिती नाही हे पोलिस चौकशी करतात तेव्हा त्यांच्या लक्षात येते.

... पण ही गोष्ट केवळ काळ्यांच्याच बाबतीत होते असे नव्हे. काळे दुसऱ्या शेजाऱ्याला विचारतात, ''दळवी, तुम्ही सहा वर्षे काही मित्रांबरोबर रमी खेळताय. सांगा, किती मित्रांच्या बायकांची माहेरची नावं तुम्हाला माहीत आहेत?'' तेव्हा दळवीही निरुत्तर होतात.

जेलसी (मत्सर) या भावनेचा निचरा करणारी एक कथा वपुंनी लिहिली आहे. 'जे फॉर' मधील टिपणीस हा कथानिवेदकाचा शाळेपासूनचा वर्गमित्र. त्याचे वर्गशिक्षक त्याला म्हणतात, ''या वयातच तुला कुणाचं चांगलं झालेलं बघवत नाही हे ठीक नाही... तू कायमचा दुःखी होशील. दुसऱ्याचं वाईट चिंतितो, तो कधी यशस्वी होत नाही.'' तो लेखकालाही सांगतो, ''आपल्या सर्व वर्गबधूमध्ये मीच जास्त यशस्वी होणार... माझा सिक्स सेन्स मला ते सांगतो.'' टिपण्या बोलायचा तसं व्हायचं. चांगलं नाही; तर वाईट. त्यामुळं लोक त्याला टाळत...

हा टिपणीस मोठेपणी लेखकाला भेटतो. व्हिजिटिंग कार्डवर टिपण्या असे टोपणनाव बघून लेखकाला हसू आवरत नाही. पासपोर्ट ऑफिसमध्ये तो बऱ्यापैकी पदावर असतो. कार त्याला कशी परवडते असा प्रश्न लेखकाला पडतो. हा टिपण्या लेखकाला सांगतो,''अन्न, वस्त्र, निवारा यासारख्याच माणसाच्या काही गरजा असतात. प्रेम, संताप, संशय या गोष्टी व्यक्त करता येतात. पण त्यांनाही मागं सारणारा एक विकार आहे. तो आतल्या आत दाबून जन्मभर हसण्याचं नाटक माणसांना करावं लागतं. मत्सर व्यक्त करायची संधी मिळाली तर अनेक लोकांना सायकिॲट्रिस्टकडे जाण्यापासून वाचवता येइल... माझं मुख्य सामाजिक कार्य त्याच्याशी संबंधित आहे. प्रत्येक



माणसाला आयुष्यभर कुणाचा ना कुणाचा मत्सर वाटत असतो. ज्या सुखाला आपण लायक आहोत ते दुसऱ्या कोणाला तरी मिळतंय याचं एक ठसठसणारं दुःख तो कायम जवळ बाळगून असतो; आणि त्याहीपेक्षा कुचंबणा अशी की हे कुठं बोलता येत नाही. त्यासाठी मी एक दिलासा मंडळ स्थापन केलंय. आपल्याला मत्सर वाटतो हे सांगणाऱ्यांचंच हे मंडळ आहेत... साडेतीन हजार आमचे मेंबर्स आहेत. ही संस्था बुडणार नाही. कारण ही मत्सरावरच चालणारी संस्था आहे. इथे ढोंगी माणसाला प्रवेश नाही. निखळ मत्सर करणारी माणसं हवीत.''

हा टिपण्या मत्सर व्यक्त करण्यासाठी जागा हवी म्हणून एक बार सुरू करतो. ड्रिंक्स घेतल्यावर माणसांचा संकोच कमी होतो. मत्सर व्यक्त करण्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून मानसशास्त्र व संज्ञापनशास्त्र यातील जाणकार स्टाफ तेथे नेमतो. बहुतेक माणसांचा मत्सर हा विनाकारण असतो. त्यांना मोकळेपणाने बोलायला मिळाले की ते नॉर्मलवर येतात. सकारण मत्सर करणाऱ्यांनाही दिलासा मंडळ न्याय मिळवून देते. उदाहरणार्थ, एखाद्याला प्रमोशन मिळायला हवे, पण त्यात कोणीतरी आडवा येत असतो. अशावेळी त्याच्या वतीने शब्द टाकणे.

— आता स्वत: कथानिवेदकच प्रमोशनला 'ड्यु' असतो. आणि त्याची स्पर्धा त्याच्या चुलतभावाशीच असते. तेव्हा टिपण्याला एक नवा मेंबर मिळणे क्रमप्राप्तच ठरते. ही हकीकत आपल्या दुसऱ्या सहकाऱ्याला सांगून नंतर निवेदक म्हणतो, ''मला त्या टिपण्याचा विलक्षण मत्सर वाटतोय.'' हे वाक्य उच्चारल्यावर त्याला एकदम हलकं वाटायला लागतं. आपण आणि टिपण्या यांच्यात काही फरक नाही असे जाणवते.

'जे फॉर' मध्ये अशा प्रकारे जेलसीकडे, मत्सराकडे पाहण्याचा एक वेगळा दृष्टिकोन वपु मांडतात. ट्रॅजेडीने कॅथार्सिस होते, तसेच या कथेने मत्सर या भावनेचे विरेचन होते, असे म्हणता येईल

'मोदी अँड मोदी' या गाजलेल्या कथेतील पारशी बॉस म्हणजे मोदी हा प्रेमळ आहे. बॉस म्हणून तो स्वत: भरपूर काम करतो, आणि कर्मचाऱ्यांकडून भरपूर कामाची अपेक्षा ठेवतो. आपल्या ऑफिसमधल्या मिस देशपांडेचे लग्न पैशामुळे लांबणीवर पडलेय हे कळताच तिला तीस हजार रुपये देऊन तिचे लग्न व्हावे अशी व्यवस्था करतो. पण नंतर तिच्याकडे एक चमत्कारिक मागणी करतो, ''हनीमूनला गेल्यावर नवऱ्याबरोबर रात्री होणाऱ्या गप्पा टेप करून, त्याची कॅसेट आणून द्यायची.'' नंतर तिला कळते की मोदीने मधुचंद्राच्या पहिल्या रात्रीच्या टेप्स इतर कर्मचाऱ्यांकडूनही घेतलेल्या आहेत. काहीजणांकडून नवराबायकोच्या भांडणाच्या टेप्सही घेतलेल्या आहेत.... या टेप्स मोदी कोणाला ऐकवत असेल असा प्रश्न सर्वांना पडलेला असतो.

....आणि शेवटी आपल्या पत्नीच्या मृत्यूने विदीर्ण झालेला मोदी या सर्वांच्या टेप्स परतही करतो. त्याबरोबर स्वत:च्या आवाजातली एक टेपही सर्वांना ऐकवतो. त्यात त्या सर्वांच्या टेप्सनी आपल्याला आनंद दिला, आयुष्यातल्या एका त्रुटीची पूर्तता या टेप्समुळे झाली असे म्हणून आभार मानलेले असतात. ही त्रुटी काय असेल? तर त्याची बायको ही मूकबधिर असते आणि त्याला पत्नीशी भांडण वा शृंगार, मुलांशी सुखसंवाद वगैरे करण्याची संधीच मिळालेली नसते...

महापालिकेच्या रुग्णालयातील औषधांच्या चोऱ्या, विशिष्ट कंपन्यांच्या औषधांचीच शिफारस, भरमसाट औषध योजना, वगैरे बाबींचा पर्दा फाश 'फ्रॉम कमिशनर्स डेस्क' या कथेच्या माध्यमातून केला गेला आहे. त्यातही वपु मेडिसिन स्टोअर्सचे इनचार्ज पेंडसे यांची वैचित्र्यपूर्ण व्यक्तिरेखा

रंगवतात. तोंडात चांदीचा चमचा म्हणजे 'सिल्व्हर स्पून इन माउथ' घेऊन काहीजण जन्माला येतात तसे पेंडसे वळलेल्या मुठीत एखादी कॅप्सुल घेऊन जन्माला आले असावेत असे लिखिते यांना वाटते. ते कायम स्टोअर्सच्या बेसमेंटमध्ये दिसतात. त्यांना स्वत:चं असं आयुष्य नसतंच. घरीही पेंडसे अबोलच असतात. फक्त सणावारी बोलतात, अशी त्यांची ख्याती. ''फ्लॅटरी किंवा खोटं बोलणं यासाठी वाचेचा उपयोग करू नये,' असे ते मानतात. ते पेंडसे औषधांच्या चोऱ्या वॉर्डबॉय किंवा कंपाउंडर नव्हे तर डॉक्टरमंडळीही करतात यावर प्रकाश टाकतात. महागडी औषधं फुकट मिळवून पेशंट ती घेऊन डॉक्टर्सना नेऊन देतात, अशीही उदाहरणे ते देतात...

एका कटू सामाजिक समस्येचे कथेच्या माध्यमातून वपु असे सादरीकरण करतात आणि संबंधितांच्या डोळ्यात अंजन घालतात.

जावडेकर नावाचे गृहस्थ वपुंना य गो जोशी - वि वि बोकील यांच्या पंक्तीत बसवून समाजासाठी निव्वळ लेखनापलीकडे आणखी काही करण्याची गरज आहे असे पत्राने कळवून भेटीची वेळ मागतात. जावडेकर आपल्या एकवीस वर्षाच्या मुलीसाठी स्थळ सुचवा असे त्यांना सांगतात. संसारात कुणाचं काय चुकतं हे सांगण्यात लेखकांनी आयुष्य घालवण्याऐवजी दोन अनुरूप व्यक्तींना एकत्र आणून आदर्श पतीपत्नीच्या जोड्या समाजासमोर पेश कराव्या असे जावडेकर म्हणतात तेव्हा त्या प्रयत्नातून एक नवेच सामाजिक वास्तव पुढे येते. .... शेवटी कथालेखक वपु म्हणतात, ''जावडेकर, कथा ह्या वेदनेची होते. तुमच्या आमच्या क्षुल्लक मानापमानाची होत नाही.''

मनस्वी जीवन जगू पाहणाऱ्या व्यक्तीची विशिष्ट मानसिकता किंवा सामाजिक वास्तवाचे एखादे अनोखे रूप वपुंच्या प्रत्येक कथेत दिसते. जीवनाबद्दलची आस्था, विविध व्यक्तींच्या संदर्भातील जिज्ञासा, संवाद साधण्याची मनोमन आवड या सर्वातून वाचकाला काहीतरी वेगळं सांगण्याची वपुंची कुशलता या कथांना वाचकांच्या भावजीवनात अढळपणे स्थानापन्न करते.

**पृष्ठे : १२८ किंमत : १००रु. सभासदांना :७५रु. पोस्टेज :२०रु.**


## टी बुक लब ११ ची नोंदणी चालू !

**सभासद फी ५०रु.**

टी बुक क्लब १०च्या सभासदांना **३१ ऑक्टोबर २००२** पर्यंत नोंदणी केल्यास **४०रु** सभासद फी!

### टी बुक क्लब ११ मधून प्रकाशित होणारी पुस्तके


| | | |
|---|---|---|
| १ द पेलिकन ब्रीफ | जॉन ग्रिशम | अनु. रवींद्र गुर्जर |
| २ द गोल्डन गेट | ॲलिस्टर मॅक्लीन | अनु. अशोक पाध्ये |
| ३ एक्झोडस् | लिऑन युरिस | अनु. बाळ भागवत |
| ४ सेव्हींग फेथ | डेव्हिड बेल्डासी | अनु. माधव कर्वे |
| ५ टाईमलाईन | मायकेल क्रायटन | अनु. प्रमोद जोगळेकर |
| ६ फर्स्ट टू डाय | जेम्स पॅटरसन | अनु. रवींद्र गुर्जर |




## समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक म्हणजे सोन्याची तिजोरी

**समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक**

**प्रा. डॉ. वनिता ठाकूर**




बडोदे येथील महाराजा सयाजीराव गायकवाड विद्यापीठाच्या मराठी विभागातील डॉ. वनिता ठाकूर यांनी समर्थ रामदास स्वामींच्या मनाचे श्लोक या २०५ श्लोकांच्या रचनेवर पीएच. डी. साठी प्रबंध लिहून १९९९ मध्ये डॉक्टरेट मिळवली. त्या प्रबंधावर आवश्यक ते संस्कार करून 'समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक' हे तीनशेवर पृष्ठाचे पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यांचे मार्गदर्शक डॉ. विलास खोले यांनी 'पुरस्कारा'त म्हटले आहे, ''वरवर पाहता सोप्या वाटणाऱ्या शब्दांतून गहन अर्थ व्यक्त करण्याची किमया संतवाङ्मयाने करून दाखवली आहे. ज्ञानदेव-नामदेव-एकनाथ-तुकारामांचे अभंग आणि रामदासांचे मनाचे श्लोक आकलनसुलभ वाटले तरी सदैव संपूर्ण आकलनापलीकडेच राहतात. जोवर ते वाचकांच्या व्यक्तिगत अनुभूतीचा विषय बनत नाहीत तोवर खऱ्या अर्थाने ते उलगडत नाहीत... मनाच्या श्लोकांचे प्रमुख प्रतिपाद्य नवविधा भक्तितत्त्व असून त्यामध्ये कर्म, उपासना व ज्ञान यांचा समन्वय झाला आहे.... सगुणभक्ती करता करता निर्गुण निराकार ईश्वरी तत्त्वाशी एकरूप होणे हा अध्यात्मसाधनेचा मार्ग मनाच्या श्लोकांनी अधोरेखित केला आहे.... अध्यात्माच्या व तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने मनाचे श्लोक हा दासबोध आणि दासबोधेतर साहित्य यांचा संक्षेप आहे.

वेदान्ताधिष्ठित भागवतधर्माचे प्रतिपादनच रामदासांनी केले आहे. त्यांनी सगुणोपासनेला निर्गुणोपासनेचे साधन मानले आहे. त्यांचे उपास्यदैवत श्रीराम हे सगुणरूप व निर्गुणरूप असे द्विविध आहे. ''साधनेच्या दृष्टीने या उपास्य दैवताची आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशी तीन रूपे रामदासांनी कल्पिली आहेत. तसेच कर्ममार्ग, ज्ञानमार्ग व भक्तिमार्ग या तिन्हींचा समन्वय मोक्षप्राप्तीचे साधन म्हणून केला आहे. सदाचारयुक्त कर्माने चित्तशुद्धी होऊन साधक आपल्या उपास्यदेवताची भक्ती करण्यास सिद्ध होतो आणि यथाक्रम निर्गुण ब्रम्हाशी एकरूप होतो.''

'मनाचे श्लोक' हे एका भव्योत्कट भावनेतून जन्मलेले श्लोक आहेत आणि एकंदर लोकमानसाचे आध्यात्मिक व ऐहिक प्रबोधन करणारे आहेत असाही डॉ. खोले यांचा अभिप्राय आहे.

समर्थांच्या एकूण रचनेचा व्याप २६५०० ओव्यांचा असला तरी दोनशे पाच श्लोकांच्या

## पुस्तकाची खास वैशिष्टये...

- मनाचे श्लोक या रचनेला समर्थ रामदासांच्या साहित्यात केंद्रवर्ती स्थान.
- दासबोध व इतर रचना यांच्याशी मनाचे श्लोक' ची आशयदृष्टया असलेली जवळीक.
- समर्थांची काव्यविषयक भूमिका ही भगवद्‌भक्तीशी निगडित आहे.
- समर्थांनी मनाचा घेतलेला शोध आजच्या मानसशास्त्रीय संशोधनाची तुल्यबळ.
- लोकाद्धाराची भव्य प्रेरणा घेऊन उत्कट उत्स्फूर्त भावनेतून जन्मलेली अजोड रचना.

'मनाचे श्लोक' या रचनेला अनन्यसाधारण स्थान आहे हे अनेक मान्यवरांच्या साक्षीने वाचकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न प्रा. वनिता ठाकूर यांनी केला आहे. आचार्य विनोबा भावे म्हणत, ''दासबोध ही सोन्याची खाण आहे तर मनाचे श्लोक ही सोन्याची तिजोरी आहे.'' समर्थ साहित्याचे थोर संशोधक शंकर श्रीकृष्ण देव यांच्या मते समर्थांनी इतर काहीही लिहिले नसते तरी केवळ मनाच्या श्लोकाच्या बळावर 'अद्वितीय राष्ट्रगुरू, असामान्य कवी, अलौकिक भगवद्‌भक्त आणि अपूर्व तत्वज्ञानी' असा त्यांचा लौकिक झाला असता.

प्रा. वनिता ठाकूर यांनी मनाचे श्लोक म्हणजे दासबोध व दासबोधेतर साहित्याचा संक्षेप होय असा निष्कर्ष काढला आहे.

एकूण पाच प्रकरणे असून प्रथम प्रकरणात समर्थ रामदासांचे चरित्र दिले आहे. समर्थांचा जन्म १६०८ मध्ये झाला. बाराव्या वर्षी घराचा त्याग. टाकळी येथे एक कोटी रामजप. बारा वर्षे प्राचीन ग्रंथांचा अभ्यास, पुढे बारा वर्षे तीर्थयात्रा. १६४४ मध्ये क्षेत्र महाबळेश्वर येथे आगमन. १६४९ मध्ये शिंगणवाडीला शिवरायांची भेट, दासबोधाचे लेखन (१६५४-६४) प्रतापगडावर तुळजाभवानीची प्रतिष्ठापना शिवरायांनी केली तेव्हा रामदासांनी भवानी स्तोत्र लिहिले. (१६५७). निश्चयाचा महामेरू ही शिवरायगौरवपर रचना (१६७२), शिवरायांनी चाफळ मठाला ११ गावांचे उत्पन्न इनाम दिले. सज्जनगडाला शिवरायांची भेट (१६७४), सज्जनगडावर तंजावरहून आणलेल्या रामसीता मूर्तींची स्थापना. शिवरायांच्या मृत्यूनंतर आठ महिन्यांनी रामदासांचे निधन (२२ जानेवारी १६८१). जन्म ते गृहत्याग, साधनाकाल, तीर्थाटन व प्रबोधन असे चार कालखंड पाडून त्या प्रत्येकाचे विवेचन केले आहे.

'मनाचे श्लोक' ही रचना समर्थांनी नेमकी कधी केली याबद्दल एकमत नाही. चाफळ येथील उत्सवाला शिवरायांकडून धान्य वगैरे सामग्री येई. एका वर्षी ती आली नाही, तेव्हा समर्थांनी आपल्या शिष्यांना गावोगाव भिक्षा मागून धान्य गोळा करण्यास सांगितले, त्या शिष्यांनी मनाचे



श्लोक खड्या आवाजात म्हणून भिक्षा जमवावी या हेतूने या दोनशे पाच श्लोकांची निर्मिती केली गेली असा तपशील शंकर श्रीकृष्ण देव यांनी दिला आहे.

'मनाचे श्लोक : अंतरंग प्रवेश' या प्रकरणात निरनिराळ्या अभ्यासकांनी मनाचे श्लोक मधील प्रतिपाद्य विषय आणि त्या श्लोकांचे आशय-विषयाचे केलेले वर्गीकरण यावर प्रकाश टाकला आहे.

शंकर श्रीकृष्ण देव हे कर्मपर श्लोक (१-६६), उपासनापर श्लोक (६७-१३१), आणि ज्ञानपर श्लोक (१३२-२०१) असे भाग पडतात.

विनोबा भावे दोनच भाग मानतात. पहिल्या १०१ श्लोकात सदाचार, ईश्वरनिष्ठा, भक्त-अभक्त लक्षण व नामस्मरण हे विषय आले आहेत, तर दुसऱ्या शतकात कीर्तनभक्ती सत्यशोधन आणि गुरुकृपालाभ हे विषय आले आहेत.

ल. रा. पांगारकर चार मुख्य भाग मानतात. विवेक वैराग्य उद्बोधन (२-२७), सगुणभक्ती (२८-१३५), निर्गुणभक्ती (१३६-१७४) आणि सगुणनिर्गुणातील शुद्धस्वरूप (१७५-२०२).

शिवाजीराव भावे यांनी उपक्रम, संसार-साधन, साधनोन्नती व धन्यता, साधनहीनता व दीनता, राम आणि नाम, क्रिया आणि वाचा, आश्वासन, केवळ ब्रम्ह, देव ब्रम्ह, जीव ब्रम्ह व उपसंहार असे अकरा भाग पाडले आहेत. त्या अनुषंगानेच या प्रकरणात विवेचन केले गेले आहे. या रचनेचे फलित दोषनाश, साधनयोग्यता, ज्ञानवैराग्य सामर्थ्यप्राप्ती व मोक्ष असे चतुर्विध असून, जर त्यापैकी एकाचाही लाभ होत नसेल तर तो श्रवणदोष होय असे म्हटले आहे.

दासबोध व इतर रचना यांचा आशय आणि मनाचे श्लोकच्या प्रतिपादनातले साम्यभेद यांचा शोध घेण्याच्या दोन प्रकरणांचा विस्तार २३० पृष्ठांचा असून, त्यामुळे एकूणच समर्थ वाङ्मयाची उजळणी होते.

प्रा. ठाकूर यांनी दोहोंची तुलना करताना संसार, संसाराची कारणे, संसारकारणांचा निरोध आणि मोक्ष या चार अंगांवर भर दिला आहे.

संसार नश्वर आहे, मन चंचल आहे, मायेमुळे भ्रम होतो आणि या तिघांपासून मुक्तता मिळवण्यासाठी श्रीरामाची आराधना हवी-अशी सुटसुटीत मांडणी समर्थांनी केली. समाजाचे कल्याण व्हायचे असेल तर रामाची उपासना हवी; कारण कर्म, भक्ती व ज्ञान या तिन्ही गोष्टींचा संगम एका रामोपासनेने होतो, असे त्यांचे मुख्य सूत्र आहे.

वीस दशक आणि दोनशे समास दासबोधात आहेत. त्यातील अठरा समासात मुख्यत: मूर्ख लक्षण, उत्तम लक्षण, कुविद्या, रजोगुण, तमोगुण, पढतमूर्ख, वैराग्य निरूपण, सद्गुरु, सच्छिष्य, बद्ध, मुमुक्षू, साधक, सिद्ध, जगजीवन, टोपणसिद्धू, ग्रंथारंभ, संसारकारण, शारदास्त्रवन असे अठरा संसारदोष दाखवण्यात आले आहेत व त्यांच्या निराकारणाबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. त्याकडे पुस्तकात खास लक्ष वेधण्यात आले आहे.

पाचव्या प्रकरणात 'मनाचे श्लोक'चे वाङ्मयीन सौंदर्य विशद करण्यात आले आहे. समर्थांची काव्यविषयक भूमिका ही भगवद्‌भक्तीशी निगडीत आहे.

देवाचेनि प्रसन्नपणे । जें जें बोलणे<br>
ते ते अत्यंत श्लाघ्य वाणें । या नाव प्रासादिक ॥ (१४.३.६.)

नस्ता कवीचा व्यापार । तरी कैंचा अस्ता जगोद्वार
म्हणौति कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ (१.७.२१)

'मनाचे श्लोक' ही रचना तिच्यातील आशयगर्भ अध्यात्मामुळे, आध्यात्मिक अनुभूतीमुळे प्रासादिक ठरते असे प्रा. वनिता ठाकूर म्हणतात. (२८२)

प्रतिमांचा विचार रिचर्ड हार्टर फोगेल यांच्या 'द इमेजरी ऑफ कीट्स अँड शेली' या ग्रंथाच्या आधारे मांडला असून मनाचे श्लोकामधील दृक प्रतिमा, व्यक्तिप्रतिमा, श्रवणगुण, विचार सौंदर्यविषयक प्रतिमा यांची उदाहरणे दिली आहेत.

भुजंगप्रयात या बारा अक्षरी वृत्ताचा वापर समर्थांनी केला आहे. त्यातील छंदोभंगाची काही उदाहरणेही शोधून काढली आहेत. (२९४).

'लोकोद्धाराची भव्य प्रेरणा घेऊन एका उत्स्फूर्त, उत्कट भावनेतून' जन्मलेल्या 'मनाचे श्लोक' या रचनेचा हा अभ्यास एकूण समर्थ साहित्याचा नवप्रत्यय देणारा आहे. प्रबंधाच्या निमित्ताने प्रा. वनिता ठाकूर यांनी घेतलेल्या परिश्रमांची कल्पनाही त्यावरून येते. समर्थभक्तांना हा प्रयत्न अभिनव वाटेल.

**पृष्ठे : ३२४ किंमत : २००रु. सभासदांना :१५०रु. पोस्टेज :२०रु.**

## नवी स्पर्धा

## शब्दकोडे

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| क | ला | बे | ये | मे | र | मा | आ |
| ट | म्रा | स | ट | न | मा | ठ | त्र |
| या | ळं | टु | ग | ना | व | रा | ट |
| मा | बी | झों | ल | णीं | व | मी | गे |
| ळ | झुं | गि | चा | न | स्वा | प | री |
| ज | र | मो | हा | र्प | वा | झे | क्ट |
| का | ह | त | द्वं | द | छं | ड | फॅ |
| र | ध | गं | यु | द्ध | ज्र्या | स | व |

रचनाकार : मनोहर बांदेकर

शेजारील चौकोनात पुरस्कारप्राप्त १९ पुस्तकांची नावे दडलेली आहेत. ती नावे ओळखा व बक्षीस मिळवा.

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून पहिल्या तीन स्पर्धकांना प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस.

**उत्तरे पाठवण्याची मुदत**
**१५ सप्टेंबर २००२**

आमचा पत्ता :

**मेहता मराठी ग्रंथ जगत,** १२१६, सदाशिव पेठ, पुणे ३०.




## खलप्रवृत्तीच्या स्त्रीयांचे थरारनाट्य

## द सिस्टरहुड

**मूळ लेखक : कॉलिन फोर्बस्**

**अनुवाद : अंजनी नरवणे**




सध्याच्या जागतिक राजकीय परिस्थितीमध्ये कॉलिन फॉर्बसची ही अत्यंत वेगवान, धाडसी आणि वाचक जणूकाही एखादा हॉलिवूडचा गतिमान रोमांचकारक चित्रपटच पहातो आहे असा आभास निर्माण करणारी कादंबरी आहे. अंजनी नरवणेंच्या मराठी शब्दांनी हे धाडस, ही गती, कायम राखली आहे. मूळ लेखनाला अनुवादिकेने अचूक शब्दात आणि भावनात साकार केले आहे.

कादंबरीच्या केंद्रस्थानी तीन दुष्टप्रवृत्तीच्या स्त्रीया आहेत. त्याचे वेगळेपण (वाईटपण) अधोरेखित करतांना, एका कतृत्ववान चांगल्या अर्थाने धाडसी स्त्रीचा ही उल्लेख करावा लागेल. पॉला! ट्वीडची सर्वात उत्तम साथ करणारी ती हेर आहे. ( हेर पेक्षाही शोधक हा शब्द तिच्या संदर्भात चपखल असेल.)

आर्थर कॉनन डॉयल, ॲगाथा ख्रिस्ती यांचे (आणि मराठीतले आपले झुंजार-काळापहाड) रहस्यकथा - कादंबरी लेखन जसे लोकप्रिय आहे. तशीच लोकप्रियता 'द सिस्टरहुड' ला मिळालेली आहे. युरोपमध्ये अनेक देश आहेत. या देशांना वर्तमानकाळात शक्तीशाली, प्रभावी नेतृत्व नाही, अशा युरोपमधल्या काही महत्वाच्या व्यक्तींचे खून होतात. खूनसत्र शोधून काढणाऱ्या ट्वीड या धाडसी सूत्रधाराला, या खूनसत्रामागे रशिया किंवा रशियापेक्षाही जास्त शंका एका पौर्वात्य देशाची येते. विषारी जिवाणूंचा वापर करून युरोपला विनाशाच्या वाटेवर नेऊन ठेवण्याचे कारस्थान एका पौर्वात्य (?) राष्ट्रप्रमुखांचा मुलगा 'हसन' हा करत असतो.

-युरोपातले नेतृत्वहीन जग बदलण्याचे, (नैतिक दृष्टया चुकीच्या मार्गाने जाणारे) स्वप्न 'तो इंग्रजी माणूस' पहात होता, ते याच कारणांमुळे. युरोपातील श्रेष्ठ अशा महत्वाच्या व्यक्तींना संपवून टाकायचे. हे ध्येय(?) 'त्या इंग्रजाचे' आहे. त्यासाठी तो 'हसन' या एका पौर्वात्य राष्ट्रप्रमुखांच्या मुलाच्या मध्यस्थीने तीनं क्रुर, दुष्ट अशा स्त्रियांची साथ घेतो. टिना लॅन्ले, करिन बर्ग, सिमॉन कारनॉट या तिघीही अतिशय सुरेख आहेत. मादक अदाकारीने पुरूषांना नादी लावण्यात आणि काबीज करण्यात त्या निष्णात आहेत.

## पुस्तकाची खास वैशिष्ट्ये...

- आजच्या समानतेच्या युगात स्त्रीयाही खलनायक असतात.
- अनेक व्यक्तीरेखा, घटना, स्थलवर्णने यातून वेगवान प्रवाहासारखी धावणारी कादंबरी.
- अतिशय वेगवान, थरारक कथानक.
- कॉलिन फोर्बस् या जगप्रसिद्ध लेखकाची मराठीत प्रथमच ओळख करून देणारी कादंबरी.
- मूळ कलाकृतीचा तितकाच सरस अनुवाद.

पाताळयंत्री, धोकेबाज, चैनी, थंड रक्ताच्या अशा या स्त्रियांची कृष्णकृत्ये वाचून अंगावर अक्षरश: शहारे येतात. आणि वर्तमान जगात पेपरमध्ये छापून आलेले अनेक संदर्भही मनात येतात. (खेडेगावी) भानामती करणाऱ्या स्त्रिया, हुंड्यासाठी सुनेला जाळणाऱ्या, गुप्त धनासाठी अर्भकांचा बळी देणाऱ्या-घेणाऱ्या अशा स्त्रिया अज्ञान, दुष्टावा... कारणे कुठलीही असोत पण अक्षरश: जीवघेणी कृत्ये करणाऱ्या अशा दुष्ट स्त्रिया(ही) जगात आहेत.

-पण सिस्टरहुडच्या या सदस्य स्त्रिया पैशांच्या प्रचंड लोभी आहेत. वेश्यावृत्तीने सुद्धा त्या पैसा कमाऊ शकतात. पण तोही त्यांना अपुरा आहे. सर्वसाधारणपणे स्त्रीही संवेदनशील, प्रेमळ, भावुक, सहृदय असते. खलप्रवृत्तीच्या स्त्रियांही जगात नाहीत असे नाही. रामायणातील कैकयी, पेशवेकाळातील आनंदीबाई. पण अशी उदाहरणे मोजकीच. बाकी स्त्री प्रतिमा सहृदय अशीच आहे.

'सिस्टरहुड'च्या या तिघी स्वतंत्रपणे काम करतात. त्यांना पिस्तुले, शस्त्रे, खून यांची पद्धतशीर तालीम दिली गेली आहे. दिवसा उजळपणे मिरवणाऱ्या या तिघी काळा बुरखा पांघरून रात्रीच्या वेळी खुनाची कृष्णकृत्ये करतात. खुनाची सुपारी तर कित्येक डॉलर्स/पौंडासाठी सहजपणे घेतात. कोणालाही मारताना त्या क्षणकालही विचलित होत नाहीत. पिस्तुलांशी त्या लीलया खेळतात.

'रोमन साम्राज्याचा ऱ्हास कां झाला? नैतिक अध:पतनामुळे आज पाश्चिमात्य देशांमध्ये हेच चित्र दिसतयं. स्त्री पुरूष समानता मी मानतो. पण आज पश्चिमेत स्त्रियांचं वर्चस्व जास्त झालं आहे. पुरूषांचा दर्जा आता दुय्यम झाला आहे. मी स्त्री द्वेष्टा नाही, पण पाश्चिमात्य संस्कृती अशा अध:पतित नीतिशून्य स्त्रियांमुळं ऱ्हास पावत आहे, या दोनही बाबतीत पौर्वात्य देशांकडून आपल्यावर जीवनमूल्यं लादली जाण्याची शक्यता आहे.' ॲमॉस पोटतिडिकेने, त्वेषाने बोलत होता.



-कादंबरीची सुरूवात एका थरार नाट्याने केली आहे. सुरूवातीचे वाक्य पॉलाच्या संदर्भातले आहे (कॉलिन फॉर्बसची शैली त्या वरून समजावी) -'काळोख तिचा मित्र होता आणि तिचा शत्रूही होता. व्हिएन्नामधील ॲनागॅस्से विभागातल्या 'त्या' पत्त्यावर 'पॉला ग्रे' पोचली तेव्हा रात्र झाली होती. मुख्य रस्त्याला लागून असलेला रस्ता निर्मनुष्य होता. वाटोळे दगड बसवलेल्या रस्त्यावर तिच्या रबरी तळ लावलेल्या बुटांचाही मुळीच आवाज येत नव्हता... 'पॉला ग्रे' च्या मागे रात्रीच्या अकरा वाजता, 'त्या इमारतीतल्या एन्जेलच्या, अतिशय मुत्सद्दी अशा जर्मन गृहस्थाच्या, व्हिएन्ना येथल्या घरात जाऊन पोहोचतो, पॉलाने इमारतीत प्रवेश करतांना एक काळा बुरखा घातलेली स्त्री पाहिलेली असते. पण ती नेमकी कोण? कशासाठी या इमारतीत आली? याबद्दल पॉला साशंकच असते.

पॉला ग्रे शूर, धाडसी आहे. एखादी स्त्री हातातले ब्रेसलेट जितक्या सहजतेने खेळवेल, तितक्या सहजतेने ती गोळ्या भरलेले ३२ ॲटोमॅटिक ब्राउनिंग खेळवते आहे. पॉला नॉबर्ट एन्जेलच्या घरात पोहोचली, तेव्हा तेव्हा तिला दिसले- 'चामड्याच्या कव्हर असलेल्या स्लिव्हेल चेअरवर बसल्या स्थितीत एन्जेलचे शरीर पुढे टेबलावर झुकले होतं. त्याच्या हातात ७.६५एम.एम.चं ल्यूगर पिस्तुल होतं आणि त्याच्या डोक्याचा मागचा भाग पिस्तुलाच्या गोळीनं छिन्नभिन्न होऊन हाडांचे तुकडे आणि रक्तानं माखला होता.' पॉला समजून चुकते, त्या खोलीतल्या टेबलावर एक कागदाचा तुकडा होता 'इन्स्टिटयूट द ला डिफेन्स' अशा शिर्षकाखाली काही नावांची यादी होती. याचा अर्थ या सात जणांना मारून टाकण्यात आले होते. एन्जल हा आठवा बळी. उरलेल्या 'हिट लिस्ट' वरच्या नावापैकी एक नाव पाहून पॉला दचकली. पार्क क्रेसन्टमधल्या एस.एस.आय.एस.च्या मुख्य ठाण्यातले तिचे बॉस 'ट्वीड' ह्यांचे ते नाव होते, तीने ती यादीची कागदी घडी पर्समध्ये टाकली. या साऱ्या रक्तपातामागे कोण असावं? या शंकेत पॉला रस्त्यावर आली.

...रस्त्यावर तिच्यासमोर चाललेल्या एका स्त्रीकडे पॉलाचे लक्ष गेले. दाट पिंग्या केसांची, तिशीच्या वयाची, लांडा निळा स्कर्ट आणि पांढरा सुती स्लिव्हलेस ब्लाऊज घातलेली ती तरुणी ऐटबाज चालीने चालत होती. तिच्या हालचालीतल्या लकबीने पॉलाला शंका आली, की एन्जेलच्या अपार्टमेंटमध्ये जातांना आणि बाहेर पडताना, जी बुरखाधारी स्त्री दिसली, ती हीच नाही? तिच्या हातातल्या चॅनेल पर्सकडे पाहून पॉलाची खात्रीच होते, की काळा डगला तिने पर्समध्ये लपवला आहे. एन्जेलचा खून करणारी 'तीच' होती. तिला गायब होण्याची संधी देणारा तिचा सहकारी (हसन) होता. एन्जेलचा खून एका स्त्रीने केला यागोष्टी बद्दल मसर्लन मार्लन आश्चर्य व्यक्त करतो. तेव्हा पॉला म्हणते 'या समान हक्कांच्या दिवसांत बायका पुरूषांपेक्षांही वाईट खलनायिकाही होऊ शकतात.'

-सिस्टरहुड पैकी ती एकजण होती. हसन हा 'त्या गूढ इंग्रजी माणसाचा' दूत होता. ॲनागॅस्सेच्या कामात पाठलाग करणाऱ्या स्त्रीकडे (पॉलाकडे) दुर्लक्ष केल्याची घोडचूक केल्याबद्दल हसन म्हणतो ''गप! काही बोलू नका'' ''का बरं? मला आवडतं की पुरूषांशी बोलायला, त्यातल्या त्यात खऱ्या मर्द पुरूषाशी बोलायला'' अशी ही बेदरकार स्त्री आहे.(कारिन बर्ग, सीमॉन कारनॉट, टिना लॅग्ले या तिघीही अशाच प्रकारच्या आहेत.) या तिघीही जणींना व्यवस्थित तालीम दिली होती, एखाद्या सराईत गुन्हेगारा सारख्या त्या पैशांच्या मोबदल्यात युरोपातील श्रेष्ठ अशा पुरूषांना संपवत होत्या. अशा कुठल्याही कामांचे त्यांना टेन्शन नसे. लीलया रक्तपात करणाऱ्या त्या स्त्रिया होत्या.

काळा बुरखा घालून या सर्व कुटिलोद्योग करीत असत. (युरोपमध्ये काही विवक्षित देशातील स्त्रिया असा बुरखा घालून वावरत असल्याने, कोणास संशय येत नसे.) हसन तिची कानउघडणी करतो. तेव्हा ती बिनधास्तपणे म्हणते ''काय वटवट लावलीस यू जर्क! '' ''काय जर्क म्हणतेस तू? टोकाचा अपमान आहे हा.'' ''अपमान ना? जेव्हा जेव्हा करता येईल तेव्हा तेव्हा करेन.'' कारिनला हातकडी घालून अतिशय क्रूर अशी शिक्षा केली जाते. 'ल्यूगर'चे ट्रेनिंग द्यायच्या निमित्ताने एन्जेलची डमी आहे, असे भासवून तिच्याकडून अजून एक खून करवला जातो.

-कादंबरीतले हे स्त्रीरुप पाहून दचकायला होते. ''शाबास, लाख डॉलर्स देण्याच्या लायकीचं काम झाले तुझे'' कठोर, कर्कश आवाजात ती म्हणाली ''मी आणखी एकाला मारलं'' तिनं ते पाकिट निर्विकारपणे घेतले. ते पाहून पाषाणहृदयी हसनही दचकला.

सीमॉनचे लक्ष ठरवले आहे, ट्वीड. ट्वीडला गोष्टीची कल्पना आहे. ट्वीड आणि पॉला हत्याकांडाचे सूत्रधार शोधण्यासाठी जीवाचे रान करतात. ''जे खुनी आपल्याला हवे आहेत, त्या बायका आहेत! गुन्हेगारी प्रवृत्तीने आता स्त्रीपुरूष समानतेला स्विकारलं आहे! ड्यूमॉंटचा खून जिनं केला ती लाल केसांची एक स्त्री होती.'' सीमॉन अतिशय सुंदर आहे. पुरूषांना सौंदर्याच्या जाळयात पकडण्यात ती निपुण आहे. ट्वीडला याची कल्पना आहे, पण तो हा उंदिरमांजराचा खेळ खेळायचा ठरवतो. सिस्टरहुडच्या पडद्यामागे कोण सूत्रधार आहे, हेच त्याला शोधायचे आहे.

सिस्टरहुडच्या स्त्रियांच्या क्रुर वर्तनाचे विश्लेषण पॉला अशा तऱ्हेने करते. ''पुरूषाचं वर्चस्व जेव्हा खूप होतं. तेव्हा स्वत:चा बचाव करण्यासाठी स्त्रियांना पुरूषांशी कसं वागावं हे शिकायला लागायचं, आता त्यांना भरपूर स्वातंत्र्य मिळाल्यानं तसं वागणं आवश्यक उरलं नाही. पण काही स्त्रियांमध्ये जुन्या कावेबाज वृत्ती टिकून असतात.'' ''अरे, पण म्हणून कोणी स्त्री अशी ओळखीच्या पुरूषांच्या डोक्याच्या चिंध्या उडवेल?'' ''आपल्या प्रतिस्पर्धी बाईपेक्षा सुंदर दिसण्यासाठी काही स्त्रियांना खूप पैसा लागतो. त्यासाठी क्रुर वागण्याची त्यांची तयारी असते.'' पॉलाचे हे मत आहे.

सिस्टरहुडच्या तिघी अशाच आहेत. ट्वीडला मारायचे त्या सारखे प्रयत्न करतात. ट्वीडशी अनेकदा आमने सामने होऊनही हे साध्य होत नाही. युरोपमधले अराजक संपवण्यासाठी दुसरी परकीय शक्ती आणायची त्यासाठी युरोपातील शक्तिशाली संघटना संपवायची. ही कल्पना राबवणारा 'तो इंग्रज' होता ॲमॉस. काळया बुरखेधारी सिस्टरहुडच्या मदतीने तो हसनच्या मार्फत हे कृत्य संभावितपणे करीत होता.

हे थरारनाट्य कॉलिन फॉर्बसने अतिशय वेगवान राखले आहे. अनेक व्यक्तिरेखा, अनेक घटना, स्थल वर्णने यातून वेगवान प्रवाहासारखी धावणारी कादंबरी वाचून संपवतो. तेव्हा या क्रुर स्त्रियांचे कौर्य आठवून, थरारून जायला होते. हेच या कादंबरीचे गुणवाशिष्ट्य आहे.

**पृष्ठे : ४०० किंमत : २५०रु. सभासदांना :१८८रु. पोस्टेज :२५रु.**



# फुले आणि काटे

## स्त्रीवादी भूमिकेतून संहितांचे वाचन होण्याची गरज

**स्त्रीवादी दृष्टिकोण :** पुरुषानुगामी साहित्याचे स्त्रीवादी वाचन ही स्त्रीवादी समीक्षेची एक नवी दिशा आहे. स्त्रीसाहित्याचे मूल्यमापन स्त्रीच्या भूमिकेत जाऊन केले पाहिजे असा हा विचार आहे. अबला, माता दासी किंवा देवता म्हणून स्त्री रूपे साहित्यात येतात ती पुरुषप्रधान संस्कृतीचा आविष्कार असतात. स्त्रीदायित्व व देवत्व या दोन्हीही प्रतिमा स्त्रीत्वाचा म्हणजेच तिच्या स्वत्वाचा बळी घेणाऱ्या असतात. स्त्रीवादी वाचक साहित्यातील स्त्रीचित्रणाचे हे एकांगी, विकृत रूप नाकारते व त्याचे परखड मूल्यमापन करते. बऱ्याचदा स्त्रीवाचकाची मनोवृत्ती पुरुष वाचकाच्या मनोवृत्तीने प्रभावित झालेली असते. या प्रक्रियेशी टक्कर देणे हे स्त्रीसमीक्षांपुढील मुख्य आव्हान आहे. स्त्रीवाचकाने स्वत:ची वाचन मनोवृत्ती जोपासली तर लिखित साहित्याविषयी नवा दृष्टिकोण तयार होऊन त्याचे नवे स्पष्टीकरण मिळेल. स्त्रीने पुरुषनिर्मित साहित्य वाचतांना पुरुषीकरणाच्या प्रक्रियेला प्रतिरोध केला  पाहिजे, तसेच स्त्रीनिर्मित साहित्य वाचताना त्यांतील आशय, संदर्भ, परंपरा यांचे संबंध दुसऱ्या स्त्रियांशी, स्त्री समाजाशी जुळविले पाहिजेत यातून स्त्रीवाचक दृष्टिकोणाची, संस्कृतीची निर्मिती होईल.

**स्त्रीकेंद्री दृष्टिकोण :** स्त्री साहित्याचा राजकारणनिरपेक्ष व वाङ्मयकृतिनिष्ठ विचार करणाऱ्या स्त्रीवादी साहित्य विचाराला ॲलन शोवॉल्टरने गायनोक्रिटिक असे म्हटले आहे. स्त्रीचे म्हणून जे एक वैशिष्ट्यपूर्ण अनुभवक्षेत्र असते, त्या अनुभव क्षेत्राला त्यांनी वाईल्ड झोन असे म्हटले आहे. ऋतुप्राप्ती व त्याचा शारीर मानसिक अवस्थांतरणाशी असणारा जैविक संबंध, स्वत:च्या शरीरात दुसऱ्या जीवाला वाढविण्याचा गर्भधारणेचा वैशिष्ट्यपूर्ण अनुभव, अपत्य संगोपनातील स्तनपानाचा शारीर मानसिक देवघेवीचा अनुभव अशा स्वशरीरनिष्ठ अनुभवांचे वैविध्य हे स्त्रियांच्या अनुभव सृष्टीचे वेगळेपण आहे. स्त्रीमन आणि पुरुषमन यांत अंतर पडते. स्त्रियांची शारीरिक व मानसिक वृत्ती ही जन्म देण्याची, दुसऱ्याला स्वत:त सामावून घेण्याची, स्वत:त रुजवण्याची असते. याउलट पुरुषीवृत्तीत अहंतेला आणि महत्त्वाकांक्षेला प्राधान्य असते. स्त्री पुरुषातील या नैसर्गिक शरीरभेदाचा विचार स्त्रीवादी साहित्यविचारात महत्वाचा मानला जातो.

अशा स्त्रीविशिष्ट अनुभवाच्या आकलनासाठी शोवॉल्टरने चार प्रकारचे नमुने सुचवले आहेत.

**१.स्त्री शरीरनिष्ठ अनुभवांचे आकलन :** शरीर आणि मन यातील अतूट नाते स्त्रियांच्या अनुभवविश्वाचे खास वैशिष्ट्य आहे. त्यांच्या अनुभव घेण्याच्या प्रक्रियेत आणि अनुभव व्यक्त करण्याच्या पद्धतीतही शरीर केंद्रस्थानी असल्याचे दिसते. मुलीचे वयात येणे हा केवळ शारीरिक बदल असत नाही, त्यांचे मानसविश्व तळापासून ढवळून काढणारा तो अनुभवाचा टप्पा असतो. गर्भारपण, बाळंतपण या केवळ स्त्रीनिष्ठ अनुभवांना कथाविषय बनवून स्त्रीशरीरातील ह्या नाट्याकडे बघण्याचा एक निकोप दृष्टिकोण विकसित केला आहे. आशा बगे, पद्मिनी बिनीवाले, विजया राजाध्यक्ष इ. लेखिकांनी शारीरिक अनुभवांकडे

सामाजिक संकेतातून बघण्याऐवजी स्त्रियांचे ऊर्जास्थान सत्-तत्व म्हणून कसे पहावे याचे दिशा दिग्दर्शन करणारे लेखन केले आहे.

**२. स्त्रीनिष्ठ मनोश्लिषण :** स्त्रीकेंद्री मानसिकता आणि पुरुषकेंद्री मानसिकता यांतील भेद लक्षात घेऊन पुरुषाला सखी आणि पत्नी या दोन्ही रूपात स्त्रियांची गरज असते आणि ते त्याचे समर्थन कसे करतात, यातील दुटप्पीपणा छाया दातार यांनी आपल्या साहित्यकृतीतून उघड केला आहे.

**३. स्त्रीकेंद्री भाषिक अभिव्यक्तीचे आकलन :** शरीर आणि मन या दोघांचा सहभाग असलेली वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली विकसित करणे. त्यासाठी खास स्त्रियांच्या भाषेचा व आविष्कार शैलीचा शोध घेणे ही स्त्रीसाहित्याच्या परिवर्तनाची महत्त्वाची दिशा आहे. असे शोवॉल्टरचे मत आहे.

**४. स्त्रीनिष्ठ सांस्कृतिक अनुभव विश्वाचे अर्थ निर्णयन :** पुराणकथांची नव्याने मांडणी करून स्त्रीशोषणाच्या पुरुषसत्ताक दृष्टिकोणाकडे लक्ष वेधून प्रयत्न आशा दामले, रोहिणी कुलकर्णी यांनी आपल्या साहित्यकृतीतून केलेला दिसतो. तसेच लोककथा, लोकगीतातील बीजाशयाचा कलात्मक उपयोग आशा बगे, विजया राजाध्यक्ष, गौरी देशपांडे, प्रतिमा इंगोले यांनी आपल्या साहित्यकृतीत केलेला आहे.

स्त्री साहित्यिकांच्या निर्मिती प्रक्रियेचा, कल्पनाशक्तीचा व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा समग्र वेध घेण्यासाठी अशी स्वतंत्र स्त्रीनिष्ठ समीक्षादृष्टी विकसित करण्याची आवश्यकता शोवॉल्टरने प्रतिपादन केली आहे. स्त्री साहित्याचे स्त्रीवादी समीक्षादृष्टीतून वर्णन, विश्लेषण व मूल्यमापन अजून फारसे झालेले नाही. त्यासाठी स्त्रीवादी समीक्षा दृष्टीतून स्त्रीसंहितांचे पुनर्वाचन होण्याची निकड आहे. किंबहुना स्त्रीवादी वाचन संस्कृतीची वाढ झाल्यास स्त्रियांच्या साहित्याची अधिक योग्य समीक्षा होऊ शकेल व ती स्त्री साहित्याच्या वाढीस पोषक ठरेल असा विश्वास वाटतो.

**सौ. मंगला वरखेडे, नाशिक**

(समीक्षेतील नव्या संकल्पना या चर्चा सत्रात पुणे विद्यापीठात वाचलेल्या निबंधातून)

## संगीतावरील प्राचीन भारतीय पुस्तकांतून आत्मप्रतीती

मात्रा आणि सूर यांचा समन्वय गाठण्यामध्ये जी काही मनोवृत्ती होते, त्यापेक्षा वेगळी मनोवृत्ती निव्वळ स्वरांच्या सान्निध्याने होते हे माझ्या लक्षात आलं. संगीत आणि भाव यांचा संबंध तर नक्कीच आहे. भावभावनांची आंदोलनं या मानसिक स्तरावरच्या गोष्टी आहेत. त्या कलाकार आणि रसिक, दोघांकडेही असतात. राग,स्वर ही भावांदोलनांशी संवाद करणारी संगीताची सामुग्री आहे. मग भाव आणि राग या दोन्ही गोष्टींचा अभ्यास करायची गरज मला वाटू लागली. त्यातून मी पुस्तकांकडे वळले.

पुस्तकं वाचून एका गोष्टीची निश्चिती झाली की, मला आतून जे वाटतं आहे ते खरं आहे.

पुस्तकं वाचून ?

हो. पुस्तकं वाचून. पुस्तकं म्हणजे आपले एकूणच कलाविषयक आणि संगीतविषयक प्राचीन ग्रंथ. हे ग्रंथ आपली सध्याची जी संगीत परंपरा आहे, याही पूर्वीचे आहेत. प्राचीन भारतीय तत्वज्ञान, निसर्गाकडे पाहाण्याची आणि एकरूप होण्याची जीवनपद्धती या सर्वांशी ते



सुसंगत आहेत आणि अनुभवसिद्ध आहेत.

**संगीताच्या भावात्मकतेचा प्रत्यय काही मला ग्रंथ वाचले म्हणून आला असं नाही. तो प्रत्यय आला म्हणून मी ग्रंथ वाचले. आपल्याला जरा कुठे ज्या विषयाची चाहूल लागते आहे तो विषय परिपूर्ण पद्धतीने या ग्रंथात चर्चिला आहे, हे लक्षात आल्यावर या ग्रंथाविषयी मला जवळीक वाटली.** त्या संगीताशी माझं नातं कुठेतरी जुळलेलं आहे याची मला जाणीव झाली आणि ते ग्रंथ माझे गुरू झाले.

**अत्यंत श्रद्धापूर्वक, त्या ग्रंथकारांचे अनुभव माझे स्वानुभव व्हावेत यासाठी मी साधना सुरू केली.**

ग्रंथकारांनी लिहून ठेवलं आहे की, मध्यम हा हास्यरसाचा स्वर आहे. आता हे प्रथम आपल्याला समजून घ्यावं लागतं आणि मग अनुभवावं लागतं.

'हास्य' या अर्थाने संगीतात हास्यरस येऊ शकत नही. म्हणजेच आनंद, प्रसन्नता या अर्थाने त्याचा अनुभव घेतला पाहिजे. मध्यमाचा ध्यास तुम्हाला लागल्याशिवाय, त्याच्या अधिकाधिक निकट गेल्याशिवाय, त्याचा इतर स्वरांशी होणारा संवाद अनुभवल्याशिवाय तुम्हाला प्रत्यय कसा येणार? एकेक स्वर हे एकेक व्यक्तिमत्त्व आहे. प्रत्येक रागात ते आपला स्थायीभाव राखून त्या रागाच्या वादी, संवादी, विवादी, अनुवादी स्वरांबरोबर वागत असतं. या सगळ्या गोष्टी सांगण्या-ऐकण्याच्या नाहीत, तर अनुभवण्याच्या आहेत. स्वर अनुभवण्यासाठी जे करावं लागते ते सांगता येण्यासारखं नाही. सात शुद्ध आणि पाच तथाकथित विकृत असे मिळून बारा स्वर. सप्तकातल्या या स्थिर सुरांची नीट ओळख करून घेण्याचासुद्धा जिथे पेशन्स, धीर नाही, तिथे त्याहून सूक्ष्म बावीस श्रुती हे सुद्धा स्वराचं सोयीसाठी आखलेलं बाह्यरूप आहे. स्वर अखंड, अविरत, प्रावाहिक आहे. त्याला त्याची स्वत:ची अंतर्गत लय, गती आहे. त्याच्या निकट जायचं म्हणजे तुम्हाला जवळजवळ त्याच्याइतकं सूक्ष्म, सुंदर आणि पवित्र व्हावं लागतं. तो आणि तुम्ही एकच असं व्हावं लागतं आणि ही शारीर किंवा बौद्धिक प्रक्रिया नाही. खूप कठीण आहे पण थोडं सोपं कसं करायचं? त्या स्वरालाच शरण जायचं. चैतन्यमय तो आपल्यात आहे. आपली जड आवरणं शक्य तेवढी दूर करायची, आपला अहं वगळत जायचं.

मी अनुभवाने सांगते, त्याला अनन्यभावाने शरण गेल्यावर तो दर्शन देतो. तोच मार्ग दाखवतो. 'तो' दर्शन देऊन गेल्यावर अन्य कशात तुम्ही रमू शकत नाही. तुमचा आत्मविश्वास, हुकमीपणा काही काही उरत नाही, फक्त उरते तळमळ.

**स्वराची प्रचीती आल्यावर तिथे अविरत टिकून राहाणं ही कलाकाराची खरी कसोटी आहे. म्हणून तर साधनेचा मार्ग सोडून चालत नाही.**

**किशोरी आमोणकर**

(अनुभव जुलै २००२ अंकातील मुलाखतीवरून )

प्रति,

## वाचकांचा प्रतिसाद

सप्रेम नमस्कार,

स. न. वि. वि.

'नॉट विदाऊट माय डॉटर' : मराठी अनुवाद -लीना सोहोनी हे आपण प्रकाशित केलेले पुस्तक मला अंतर्बाह्य आवडले. 'करुण हाच एकमेव रस आहे', हे भवभूतीचे वचन इथे सार्थ झाले आहे. अनुवाद सरस आहे. पुस्तकाची मांडणी, छपाई व निर्मिती उत्कृष्ट आहे.

कळावे, ही विनंती.

आपला स्नेहांकित
हेमन्त इनामदार
'संतोष', भारतीनिवास कॉलनी, ६०/१५, एरंडवणे, पुणे : ४

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे

यांना सादर नमस्कार.

महाराष्ट्रामध्ये मराठी साहित्याच्या विकासासाठी आपण करीत असलेले प्रयत्न स्तुत्य आणि लक्ष्यवेधी आहेत. वाचन संस्कृती विकसित होण्यासाठी आपण राबवित असलेल्या प्रयत्नांना मोलाचे स्थान आहे. त्यादृष्टीने आपले प्रकाशन सतत धडपडत असते. मराठी पुस्तकांच्या विकास इतिहासात आपल्या प्रकाशनाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल, अशी वस्तुस्थिती आहे.

'मेहता मराठी ग्रंथजगत' या मासिकाने अल्पावधीत वाचकांच्या जगात आपला असा खास ठसा उमटविला आहे.

आपली नवनवीन दर्जेदार पुस्तके परगावी आपल्या सभासदांना स्वत:च्यात गावी मिळावीत म्हणून मेंबर कार्ड देऊन तशी व्यवस्था करीत आहात, हे चांगले भरीव पाऊल आहे.

कळावे,

आपला
शिवशंकर उपासे
आजरा, जिल्हा कोल्हापूर ५.



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ ऑगस्ट २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक आठवा

संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

संपादन सहाय्य :
सुनीता दांडेकर

अंकाची किंमत १० रु.

वार्षिक वर्गणी
मनीऑर्डरने पाठवावी.

प्रसिद्धी
दरमहा १५ तारखेस

— *अनुक्रमणिका* —

| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **पुरस्कार** | २० |
| **पुस्तक परिचय** | |
| संवादिनी : वपु काळे | २४ |
| स्वर : वपु काळे | २९ |
| इन्टिमेट : वपु काळे | ३३ |
| समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक : प्रा. वनिता ठाकूर | ३७ |
| द सिस्टरहुड : अनुवाद अंजनी नरवणे | ४१ |
| **फुले आणि काटे** | ४५ |
| **नवी स्पर्धा** | ४० |
| **स्पर्धा निकाल** | ३२ |

मांडणी-अक्षरजुळणी :
***मेहता पब्लिशिंग हाऊस***

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०.
फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
Email - mehpubl@vsnl.com

**वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षाची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*